रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३१३
www.ramprahar.com

◆ सोमवार, १ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

# शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये!

## मुख्यमंत्री कार्यालयाचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील विविध भागांमध्ये १ जूनपासून वादळी पावसाची शक्यता व्यक्त करण्यात येत असली तरी हा पाऊस मान्सूनचा नसल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी या पावसावर विसंबून पेरणीची घाई करू नये, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयाने केले आहे.

सध्या नैऋत्य मान्सून अद्याप केरळ किनारपट्टीपर्यंत पोहचला नसून महाराष्ट्रात त्याच्या आगमनासाठी आणखी काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार आहे. हवामान अंदाजानुसार राज्यातील बहुतांश भागांत किमान १० जूनपर्यंत मान्सून दाखल होण्याची शक्यता कमी आहे.

विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र, खान्देश तसेच कोकणातील काही भागांत दुपारनंतर ढगाळ वातावरण आणि वादळी पावसाचा अंदाज आहे. त्यामुळे तापमानात काही प्रमाणात घट होण्याची शक्यता असली तरी पूर्व विदर्भातील काही भागांमध्ये उष्णतेचा प्रभाव कायम राहू शकतो.

शेतकरी बांधवांनी मान्सूनपूर्व वादळी पावसावर अवलंबून राहून पेरणीची घाई करू नये. योग्य आणि स्थिर पावसाची खात्री झाल्यानंतरच पेरणीचे नियोजन करावे. विजांच्या कडकडाटाच्या वेळी विशेष खबरदारी घ्यावी. झाडाखाली, टिनशेडखाली, वीज खांब, ट्रान्सफॉर्मर किंवा विद्युत वाहिन्यांच्या जवळ थांबणे टाळा. स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी, असेही आवाहन मुख्यमंत्री कार्यालयाने केले आहे.

कृषी तज्ज्ञांच्या मते मान्सूनपूर्व वादळी पाऊस हा बहुतांश वेळा तात्पुरता आणि अनियमित स्वरूपाचा असतो. अशा पावसावर आधारित पेरणी केल्यास नंतर दीर्घ खंड पडल्यास बियाण्यांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाईघाईने पेरणी न करता मान्सूनची नियमित आणि स्थिर सुरुवात झाल्यानंतरच शेतीकामांचे नियोजन करावे. हवामानाचा अंदाज लक्षात घेऊनच निर्णय घेणे आवश्यक आहे.



**पनवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात कार्यक्रमाचे रविवारी मिडलक्लास हाऊसिंग सोसायटीमध्ये उत्साही वातावरणात सामूहिक श्रवण करण्यात आले. यासाठी येथील रहिवासी बकुळ दयानंद भानुशाली यांच्या निवासस्थानी आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक परेश ठाकूर, सुमित झुंजारराव, संदीप पाटील यांच्यासह नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान मोदींनी मांडलेले प्रेरणादायी विचार, राष्ट्रहिताचे विविध विषय आणि देशभरातील सकारात्मक उपक्रमांबाबतचे मार्गदर्शन उपस्थितांनी मनःपूर्वक ऐकले.**

## आज पनवेलमध्ये भव्य सांगीतिक कार्यक्रम

**पनवेल** : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समिती, श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि नादब्रह्म साधना मंडळ खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि.१) सायंकाळी ५ वाजता पनवेल येथे स्वर संध्या या भव्य सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात सादर होणार असून रसिकांसाठी प्रवेश विनामूल्य आहे.




लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्याचा गौरव करण्यासाठी अमृत महोत्सवी वर्ष विविध उपक्रमांनी साजरे होत आहे. (पान २ वर..)









# येत्या आठ-दहा दिवसांत शेतकरी कर्जमाफी -कृषीमंत्री



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थमंत्री म्हणून आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर करताना शेतकरी कर्जमाफी योजनेची घोषणा केली होती. राज्याचे कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी या योजनेच्या कार्यवाहीबाबत माहिती दिली आहे.

अहिल्यानगरमधील चौडी येथे अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्ताने रविवारी (दि.३०) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला राज्य मंत्रिमंडळाचे मंत्री उपस्थित होते. यावेळी भाषण करताना कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी, अर्थसंकल्पात मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना येत्या आठ-दहा दिवसांत लागू केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कृषीमंत्री भरणे म्हणाले की, कर्जमाफीच्या निर्णयाबाबत घोषणा करण्याचा अधिकार हा राज्याचे मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री यांचा आहे, मात्र आज अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या कार्यक्रमात बोलताना कृषीमंत्री म्हणून या योजनेबाबत मी माहिती देणार आहे. अहिल्यादेवी होळकरांच्या नावाने असलेल्या योजनेंतर्गत येत्या आठ-दहा दिवसांत शेतकऱ्यांची कर्जमाफी केली जाणार आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्य सरकारने दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीची घोषणा केली होती. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी सहकार विभागाने जिल्हा मध्यवर्ती बँका तसेच राष्ट्रीयीकृत बँकांकडून थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती गोळा केली आहे. संकलित माहितीनुसार कर्जमाफीच्या प्रक्रियेला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे.

## कर्जतमध्ये साडेतीन लाख रुपयांची चोरी; गुन्हा दाखल

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगरपरिषद हद्दीतील दहिवली विभागातील एकता नगर मध्ये घरफोडी करून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा साडे तीन लाखांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला. चोरी झालेले कुटुंब दोन दिवस मुलीकडे गेले होते.



दहिवली परिसरातील एकता नगरमध्ये राहणारे अंकुश जाधव आपल्या कुटुंबियांसह आपल्या मुलीकडे वाई येथे गेले होते. या कालावधीत चोरट्यांनी जाधव यांच्या घराच्या मागील दाराची कधी उचकटून घरात प्रवेश केला व घरातील कपात फोडून कपाटातील पाच तोळे सोने व रोख सत्तर हजार रुपयांची रक्कम असा साडे तीन लाख रुपयांचा ऐवज लंपास केला.

मोरे जेंव्हा काल रात्री साडे दहाच्या सुमारास घरी आले तेंव्हा त्यांना चोरी झाल्याचे निर्दशनास आले. त्यांनी पोलीस ठाण्याशी संपर्क केला. सहाय्यक पोलीस निरीक्षक तौसिफ़ सय्यद यांनी पोलिसांसह घटना स्थळी जाऊन पहाणी केली व तपास सुरु केला. त्यांनी श्वान पथक बोलवून घेतले परंतु चोरी कुणी केली? हे समजले नाही.

## घरासमोरून रिक्षा लंपास

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर १० येथील कोपरा गावात घरासमोर उभी केलेली रिक्षा मध्यरात्री लंपास झाल्याची घटना उघडकीस आली आहे. ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून त्यात एक तरुण रिक्षा चोरताना स्पष्टपणे दिसत आहे. पनवेल परिसरात रिक्षाचोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याने रिक्षाचालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

राकेश कामोटकर यांनी नेहमीप्रमाणे आपली रिक्षा घरासमोर पार्क केली होती. मध्यरात्री अज्ञात चोरट्याने संधी साधून रिक्षा पळवून नेली. सकाळी रिक्षा जागेवर नसल्याचे लक्षात येताच त्यांनी परिसरात शोध घेतला. रिक्षा न सापडल्याने सीसीटीव्ही फुटेज तपासले असता चोरीचा प्रकार उघड झाला. या घटनेनंतर खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे आरोपीचा शोध सुरू केला आहे.

## नवी मुंबई शहर पथविक्रेता सदस्य निवडणूक

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या पथविक्रेता निवडणूक नियम प्रणालीमध्ये नमूद केलेल्या एकूण २० सदस्य संख्येमध्ये आठ पथविक्रेते सदस्य असणार आहेत. सदरचे आठ पथविक्रेता सदस्य पथविक्रेत्यांमधून निवडणुकीद्वारे निवडून द्यावयाचे आहेत.

यास अनुसरून ४ जून रोजी होणाऱ्या मतदानासाठी सर्वसाधारण महिला राखीव एका जागेसाठी चार उमेदवार निवडणूक लढवणार असून, सर्वसाधारण (खुला) २ जागांसाठी १४ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. अनुसूचित जाती (महिला) - १, इतर मागास प्रवर्ग (महिला) - १, अल्पसंख्याक (सर्वसाधारण) - १ आणि विकलांग/दिव्यांग (सर्वसाधारण) - १ या प्रवर्गात केवळ एक अर्ज पात्र असल्याने या प्रवर्गाची निवडणूक बिनविरोध होत आहे.अनुसूचित जमाती १ जागा रिक्त : अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) या प्रवर्गासाठी एकही अर्ज आला नसल्याने सदर जागा रिक्त राहिली आहे. नवी मुंबई महानगरपालिका शहर पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक कार्यक्रम २०२६ अंतर्गत प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी प्रक्रिया दिनांक २० मे २०२६ रोजी झाली. यामध्ये आक्षेप आणि हरकतीनंतर २ अर्ज बाद झाले. यात अल्पसंख्याक प्रवर्गातील १ आणि विकलांग प्रवर्गातील १ अर्जाचा समावेश आहे. २७ मे रोजी सायं. ५ वाजेपर्यंत एकूण ७ उमेदवारी अर्ज माघारी घेण्यात आले.

सर्वसाधारण प्रवर्गातील ५, अल्पसंख्याक प्रवर्गातील १ व अनुसूचित जाती प्रवर्गातील एका उमेदवाराने अर्ज मागे घेतला. निवडणुकीत शहरातील पथविक्रेता मतदार यादीत नाव असलेल्या पथविक्रेत्यांनी ४ जूनला आपापल्या विभागात निश्चित करण्यात आलेल्या मतदान केंद्रावर मतदान करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी अजय साबळे यांनी केले आहे.

## ३० औषधांचे किरकोळ दर निश्चित, रुग्णांना दिलासा!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नॅशनल फार्मास्युटिकल प्राइसिंग अथॉरिटीने ज्या औषधांच्या किमती निश्चित केल्या आहेत, त्यामध्ये व्हिटॅमिन डी-३ ओरल, कॅल्शियम, व्हिटॅमिन डी३ आणि मेथिलकोबालामिन यांसारख्या महत्त्वाच्या औषधांचा समावेश आहे. ही औषधे हाडांची मजबुती वाढवणे, शरीरातील जीवनसत्त्वांची कमतरता भरून काढणे, मज्जासंस्थेशी संबंधित समस्या दूर करणे आणि पोषणतत्त्वांची कमतरता कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वापरली जातात.

अधिसूचनेनुसार, कॅल्शियम व व्हिटॅमिनयुक्त गोळीची किंमत प्रति गोळी १९.७८ रुपये निश्चित करण्यात आली आहे, तर व्हिटॅमिन डी३ ओरलची किंमत प्रति मिलिलिटर १९.९१ रुपये ठरविण्यात आली आहे. याशिवाय वेदना आणि सूज कमी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या काही औषधांच्या किमतीही निश्चित करण्यात आल्या आहेत.

## डॉ. प्रियांका डोके मांडलिक यांना राष्ट्रीय वूमन एम्पॉवरमेंट अवॉर्ड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महिला सक्षमीकरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत डॉ. प्रियांका डोके मांडलिक यांना राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित 'वुमन एम्पॉवरमेंट अवॉर्ड' प्रदान करण्यात आला. बॉलिवूड अभिनेते निल नितीन मुकेश यांच्या हस्ते त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

समाजातील महिला सक्षमीकरण, शिक्षण, सामाजिक जागरूकता आणि विविध क्षेत्रांतील योगदानाबद्दल डॉ. प्रियांका डोके मांडलिक यांचा गौरव करण्यात आला. या पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. प्रियांका डोके मांडलिक यांनी हा सन्मान समाजसेवा, महिला सक्षमीकरण आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व महिलांना समर्पित असल्याची भावना व्यक्त केली. तसेच भविष्यातही समाजहितासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. या सोहळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ आणि प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या.

## अकरावी प्रवेशासाठी गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला सादर करण्यास मुदत

**मुंबई : प्रतिनिधी**

दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांना अद्याप मूळ गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला प्राप्त झालेला नसल्याने अकरावी प्रवेश प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी प्रवेश निश्चित करताना ही कागदपत्रे तात्काळ सादर करण्याची सक्ती न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्यातील इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत सहभागी विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या निर्देशानुसार शालेय शिक्षण विभागाने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ.महेश पालकर यांनी याबाबत सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) आणि कनिष्ठ महाविद्यालयांना सूचना जारी केल्या आहेत. सन २०२६-२७ च्या अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत नियमित फेरी क्रमांक १ सुरू असून २९ मे २०२६ रोजी गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश निश्चित करताना मूळ गुणपत्रक आणि शाळा सोडल्याचा दाखला अनिवार्यपणे सादर करण्याची अट तात्पुरती शिथिल करण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांना संबंधित कागदपत्रे अद्याप प्राप्त झालेली नाहीत, त्यांच्याकडून गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला उपलब्ध होताच सादर करण्यात येईल, असे हमीपत्र घेऊन प्रवेश निश्चित करता येणार आहे. आधार व्हेरिफाइड विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका डिजीलॉकर मध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

गुणपत्रक आणि शाळा सोडल्याचा दाखला निर्धारित कालावधीत सादर न केल्यास संबंधित विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करण्यात येऊ शकतो, याची जाणीव विद्यार्थी व पालकांना करून देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.या निर्णयामुळे दहावीचा निकाल लागल्यानंतर कागदपत्रांच्या प्रतीक्षेत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेश प्रक्रियेत वेळेत सहभागी होणे शक्य होणार आहे.

## १० जूनपर्यंत राज्यातील बहुतांश भागात मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही!

**मुंबई : प्रातिनिधी**

सध्या राज्यातील हवामानात बदल होण्यास सुरुवात झाली आहे, आणि १ जून पासून सुरु होणाऱ्या आठवड्यात हवामानात अजून बदल होईल. प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशात दुपार नंतरचे ढग आणि काही प्रमाणात वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

कोकणात देखील काही प्रमाणात पावसाचा अंदाज आहे. याच बरोबर मे महिन्याच्या तुलनेत राज्यातील कमाल तापमानात घट होईल, मात्र विदर्भातील काही भागांमध्ये, प्रामुख्याने पूर्व विदर्भ, कमाल तापमान ४० अंशाच्या वर कायम राहील. आगामी वादळी पावसाचा मान्सूनशी काहीही संबंध नाही, कारण मान्सून अद्याप केरळात पोहोचलेला नाही. सध्याच्या स्थितीनुसार राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान १० जूनपर्यंत मान्सून आगमनाची शक्यता नाही.

कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांकडून शेतकऱ्यांना आणि लोकांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी: शेतकऱ्यांनी वादळी पावसावर अवलंबून राहून आणि मान्सूनचे आगमन होण्यापूर्वी पेरणीची घाई करू नये.

## मुंबई-गोवा महामार्गावर भीषण अपघात; मद्यधुंद डंपरचालकाने दुचाकीस्वार दोघांना चिरडले

**खारपाडा : रामप्रहर वृत्त**

मुंबई-गोवा महामार्गावरील खारपाडा परिसरात अवैध पद्धतीने ओव्हरलोडेड गौण खनिज वाहून नेणाऱ्या भरधाव डंपरच्या धडकेत दुचाकीवरील दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना ३० मे रोजी रात्री घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ३० मे रोजी रात्री सुमारे ११.१५ वाजण्याच्या सुमारास पेण-पनवेल मार्गावरील खारपाडा गावातील पोलीस चौकीसमोर हा अपघात घडला. डंपर चालकाने मद्यप्राशन करून वाहन अतिवेगाने, निष्काळजीपणे व बेदरकारपणे चालविल्याने त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक बसली.

या भीषण अपघातात दुचाकीवरील आदित्य किशोर बल्लाळ वाडकर (वय २२) आणि यश मुकेश बल्लाळ (वय १२) यांचा जागीच मृत्यू झाला आहे. मृत दोघेही मूळचे चिपळूण तालुक्यातील असून सध्या मुंबईतील विक्रोळी परिसरात वास्तव्यास होते.या घटनेप्रकरणी मृत मुलांपैकी एकाचे वडील मुकेश चंद्रकांत बल्लाळ यांनी फिर्याद दिली आहे. आरोपी डंपर चालक गौतम लक्ष्मण महतो, मूळ रा. बोकारो (झारखंड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच दादर सागरी पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.

## पान १ वरुन

### आज पनवेलमध्ये भव्य सांगीतिक कार्यक्रम

याचाच एक भाग म्हणून आयोजित "स्वर संध्या" या कार्यक्रमात संगीतप्रेमींसाठी दर्जेदार आणि सुरेल संगीताची मेजवानी अनुभवायला मिळणार आहे. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायिका सारेगमप लिटल चॅम्प फेम अंजली गायकवाड तसेच ज्ञानेश्वरी गाडगे आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत.

यावेळी पं. प्रतापबुवा पाटील यांची मृदंग साथ, प्रसाद पाध्ये यांची तबला साथ तसेच सूर्यकांत सुर्वे यांची तालवाद्य साथ लाभणार आहे. अनुभवी कलाकारांच्या साथसंगतीमुळे कार्यक्रमाची रंगत अधिक वाढणार आहे. याशिवाय नवदुर्गा प्रासादिक भजन मंडळ कोपरा यांच्या वतीने सुरेल भजन सादर करण्यात येणार असून गायिका शिवमाला पाटील, पखवाजवादक निलेश पाटील व तबला साथीसाठी मृगेंद्र कडू हे कलाकार सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोहर मडके करतील.

संगीत, भजन आणि सांस्कृतिक परंपरेचा संगम असलेल्या या अविस्मरणीय मैफलीचा लाभ रसिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## एसटीच्या उपाहारगृहात मंत्र्यांची साधी-सरळ भेट; प्रवाशांसोबत गरमागरम वडापावचा आस्वाद!

**संगमेश्वर : प्रतिनिधी**

एसटी बसस्थानक म्हटलं की अनेकांच्या मनात अस्वच्छता, गर्दी, कळमळट वातावरण आणि उपहारगृहांबाबतच्या तक्रारींचे चित्र उभे राहते. मात्र संगमेश्वर बसस्थानकात शुक्रवारी रात्री घडलेले दृश्य या सर्व समजुतींना छेद देणारे ठरले. कारण महाराष्ट्राचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी चक्क प्रवाशांसोबत बसून एसटीच्या कॅन्टीनमधील गरमागरम वडापाव आणि कॉफीचा आस्वाद घेत सर्वांनाच सुखद धक्का दिला.

कोकण दौऱ्यावर असलेल्या मंत्री सरनाईक यांनी रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास संगमेश्वर बसस्थानकाला भेट दिली. नव्याने उभारलेल्या या आधुनिक बसस्थानकात संध्याकाळीही प्रवाशांची मोठी वर्दळ होती.



बसची वाट पाहणाऱ्या प्रवाशांशी त्यांनी मनमोकळा संवाद साधला, त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि उपलब्ध सुविधांबाबत आपुलकीने चौकशी केली.

यावेळी त्यांनी बसस्थानकातील प्रसाधनगृहे, हिरकणी कक्ष आणि इतर प्रवासी सुविधांची पाहणी करून स्वच्छता व व्यवस्थेबाबत समाधान व्यक्त केले. स्वच्छ, टापटीप आणि प्रसन्न वातावरणाने नटलेल्या या बसस्थानकाची पाहणी करत असताना त्यांची पावले नकळत एसटीच्या उपहारगृहाकडे वळली. उपहारगृहात अनेक प्रवासी गरमागरम भजी, वडापाव, चहा आणि कॉफीचा आनंद घेत होते.

त्या सुगंधाने आणि प्रसन्न वातावरणाने मंत्रिमहोदयांनाही मोह आवरला नाही. त्यांनी थेट प्रवाशांमध्ये जाऊन बसत गरमागरम वडापाव आणि कॉफीची चव चाखली. एका मंत्र्याने कोणताही बडेजाव न करता सर्वसामान्य प्रवाशांसोबत बसून एसटीच्या कॅन्टीनमधील पदार्थांचा आस्वाद घेणे, हा अनुभव उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला.

क्षणभर अनेकांना आपल्या डोळयांवर विश्वास बसत नव्हता. राज्याचे परिवहन मंत्री आपल्या शेजारी बसून गप्पा मारत वडापाव खात आहेत, हे दृश्य पाहून प्रवाशांच्या चेहऱ्यावर आश्चर्य आणि आनंद एकाच वेळी झळकत होता. संगमेश्वर बसस्थानकातील हा प्रसंग केवळ एका पाहणी दौऱ्यापुरता मर्यादित राहिला नाही, तर एसटीच्या बदलत्या चेहऱ्याचे आणि प्रवाशांशी जपल्या जाणाऱ्या आत्मीय नात्याचे प्रतीक ठरला.

## मुख्याध्यापक कैलास सत्रेंची सेवापूर्ती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर मराठी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास गोविंदा सत्रे नियत वयोमानानुसार ३० मे रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. यावेळी सत्रे सरांना संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आशीर्वादपर शुभेच्छा दिल्या. कार्यकारिणी सदस्य वर्षा ठाकूर यांनीदेखील शुभेच्छा दिल्या.

सत्रे यांच्या प्रदीर्घ आणि समर्पित सेवेचा गौरव करण्यात आला. त्यांनी या विद्यालयात तब्बल २८ वर्षे इंग्रजी विषयाचे सहाय्यक शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे कार्य केले असून नोव्हेंबर २०२३पासून त्यांनी मुख्याध्यापकपदाची धुरा अत्यंत समर्थपणे सांभाळली. त्यांच्या ३१ वर्षांच्या या शैक्षणिक प्रवासातील योगदानाचा गौरव करण्यासाठी संस्थेच्या वतीने व्हाइस चेअरमन वाय.टी. देशमुख यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला व सेवानिष्ठचे कौतुक करण्यात आले.

यावेळी संस्थेचे सचिव डॉ.एस.टी. गडदे यांनी सेवापूर्तीनंतरच्या प्रवासासाठी सत्रे यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला प्रभारी प्राचार्य प्रशांत मोरे. पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, हरिश्चंद्र ठाकूर, संस्था इंजिनियर दर्शन ठाकूर, यांच्यासह विद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सत्रे यांच्याप्रती आपला आदर व्यक्त केला.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# कल्पतरू रिव्हरसाईडची हरित ऊर्जा क्रांती; ४०० किलोवॅट सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

- दरवर्षी ८० लाख ते एक कोटी रुपयांची होणार बचत
- महाराष्ट्रातील गृहनिर्माण क्षेत्रासाठी आदर्श प्रकल्प





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई व पनवेल परिसरातील पर्यावरणपूरक उपक्रमांसाठी ओळखल्या जाणाऱ्या कल्पतरू रिव्हरसाईड या भव्य निवासी संकुलाने शाश्वत विकासाच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत १०० किलोवॅट क्षमतेच्या नव्या सौरऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन यशस्वीरीत्या केले. माजी सभागृह नेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले.

यापूर्वी संकुलात ३०० किलोवॅट क्षमतेची सौरऊर्जा प्रणाली कार्यान्वित करण्यात आली होती. तिचे उद्घाटन आमदार प्रशांत रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले होते. नव्या १०० किलोवॅट प्रकल्पामुळे आता संकुलाची एकूण सौरऊर्जा निर्मिती क्षमता ४०० किलोवॅटपर्यंत पोहचली असून महाराष्ट्रातील निवासी गृहनिर्माण क्षेत्रातील सर्वात मोठ्या सौरऊर्जा उपक्रमांपैकी हा एक प्रकल्प मानला जात आहे.

सुमारे ८५० कुटुंबांचे वास्तव्य असलेल्या कल्पतरू रिव्हरसाईडमध्ये ओला व सुका कचरा व्यवस्थापन, कंपोस्ट निर्मिती, सांडपाणी शुद्धिकरण प्रकल्प (STP), पुनर्वापरित पाण्याचा वापर, व्यापक वृक्षारोपण आणि विविध पर्यावरणपूरक उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहेत. त्यामुळे हे संकुल 'ग्रीन कम्युनिटी'चे आदर्श उदाहरण म्हणून ओळखले जाते.

४०० किलोवॅट क्षमतेची सौरऊर्जा प्रणाली कार्यान्वित झाल्याने सोसायटीच्या वीज खर्चात मोठी बचत होणार असून दरवर्षी सुमारे ८० लाख ते एक कोटी रुपयांपर्यंत बचत अपेक्षित आहे. त्याचबरोबर राज्याच्या वीज वितरण व्यवस्थेवरील ताण कमी करण्यासाठीही हा प्रकल्प मोलाची भूमिका बजावणार आहे.

यावेळी अध्यक्ष प्रशांत बाळाराम ठाकूर यांनी या प्रकल्पाच्या यशाचे श्रेय मिलिंद कुलकर्णी, अभिजित पाटील आणि सतीश पिल्ले यांना देत सांगितले की, ऊर्जा स्वावलंबन आणि पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे. कल्पतरू रिव्हरसाईडने समाजासमोर एक आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. हरित ऊर्जा निर्मितीच्या दिशेने वाटचाल करू इच्छिणाऱ्या कोणत्याही गृहनिर्माण संस्थेला आमच्या अनुभवाचा लाभ देण्यासाठी आम्ही सदैव तयार आहोत. महाराष्ट्रातील अधिकाधिक सोसायट्या ऊर्जा स्वावलंबी व्हाव्यात ही आमची भूमिका आहे.

प्रमुख पाहुणे नगरसेवक परेश ठाकूर यांनी कल्पतरू रिव्हरसाईडच्या व्यवस्थापन समितीचे कौतुक करताना सांगितले की, ८५० कुटुंबांचे हे विशाल संकुल म्हणजे स्वतःमध्ये एक छोटे शहर आहे. अशा ठिकाणी सर्वांना सोबत घेऊन पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर प्रकल्प यशस्वीपणे राबविणे ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे.

कार्यक्रमास सोसायटीचे सचिव नितीन ठाकूर, खजिनदार पुरुषोत्तम तळेकर, व्यवस्थापन समिती सदस्य, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने रहिवासी उपस्थित होते.

## 'टीआयपीएल' कर्मचाऱ्यांचा सेवापूर्ती गौरव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडच्या वतीने कंपनीत प्रदीर्घ काळ कार्यरत असणारे अकाउंट जनरल मॅनेजर अरुण जनार्दन नाईक आणि अकाउंट मॅनेजर अनिल भाऊराव देशमुख या निष्ठावंत कर्मचाऱ्यांसाठी भव्य आणि भावूक सेवापूर्ती गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. हा सोहळा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

उलवे येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट कॉम्प्लेक्समध्ये अत्यंत उत्साहात हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमात आपल्या अथांग परिश्रमाने आणि निष्ठेने कंपनीच्या प्रगतीत मोलाचे योगदान देणारे अकाउंट जनरल मॅनेजर अरुण जनार्दन नाईक आणि अकाउंट मॅनेजर अनिल भाऊराव देशमुख या दोन ज्येष्ठ कर्मचाऱ्यांचा जाहीर सन्मान करण्यात आला. यामध्ये अरुण नाईक यांनी ४२ वर्षे आणि अनिल देशमुख यांनी ३८ वर्षे सेवा देणाऱ्या या दोन अष्टपैलू सहकाऱ्यांचा समावेश होता. त्यांच्या प्रदीर्घ, प्रामाणिक आणि समर्पित सेवेची दखल घेऊन कंपनी प्रशासनाच्या वतीने त्यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दोन्ही सत्कारमूर्तींच्या कामाचे भरभरून कौतुक केले. कोणतीही संस्था ही तिथल्या कर्मचाऱ्यांच्या निष्ठेवर उभी राहते आणि या दोन्ही सहकाऱ्यांनी आपल्या कर्तृत्वाने कंपनीला एका वेगळ्या उंचीवर नेले आहे, अशा शब्दांत त्यांचा गौरव करण्यात आला. या वेळी कंपनीचे डायरेक्टर माताप्रसाद त्यागी, भरणीकुमार, आदेश ठाकूर यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी अरुण नाईक आणि अनिल देशमुख यांच्यासोबतचे जुने अनुभव सांगून आठवणींना उजाळा दिला. या भावूक आणि कौतुकास्पद सोहळ्याचा शेवट कंपनीच्या व्यवस्थापनाने दोन्ही कर्मचाऱ्यांना त्यांच्या अमूल्य सेवेबद्दल मनःपूर्वक धन्यवाद देऊन आणि त्यांच्या पुढील निरोगी व आनंदी सेवानिवृत्त आयुष्यासाठी भरभरून शुभेच्छा देऊन केला.

कार्यक्रमावेळी कंपनीचे कर्मचारी वैभव ठाकूर, गणेश पाटील आणि स्मिता जाधव यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला असून त्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.



## पुण्यश्लोक अहिल्यादेवींना पनवेल महापालिकेत अभिवादन

**पनवेल :** पनवेल महापालिकेच्या मुख्यालयात रविवारी (दि. ३१) दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण, कार्यक्षम राज्यकर्त्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर दूरदर्शी व आदर्श महिला शासकांपैकी एक होत्या. त्यांचे संपूर्ण जीवन प्रजाहित आणि लोककल्याणासाठी समर्पित होते. त्यांच्या देदीप्यमान कार्याचे उपस्थितांनी स्मरण केले. या वेळी महानगरपालिका सदस्य अजय बेहरा, सायली सरक, सामान्य प्रशासन विभागप्रमुख कीर्ती महाजन यांच्यासह महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

## शिवसेना नेते रामदास शेवाळे यांच्या वाढदिवसानिमित्त कळंबोलीत रोजगार मेळावा

**पनवेल : प्रतिनिधी**

शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्या ६०व्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेलमध्ये एका भव्य रोजगार मेळाव्याचे अत्यंत यशस्वी आयोजन करण्यात आले होते. सुशिक्षित तरुणांना हक्काचा रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबवण्यात आलेल्या या स्तुत्य उपक्रमाला युवक-युवतींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या मेळाव्याचे उद्घाटन आणि प्रमुख मार्गदर्शन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. वाढदिवसाचे औचित्य साधून केवळ सत्कार सोहळे न करता तरुणांच्या भविष्याला आकार देणारा हा उपक्रम खरोखरंच कौतुकास्पद असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

या रोजगार मेळाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे यामध्ये रिलायन्स इंडिया आणि महानगर गॅस यांसारख्या नामांकित उद्योगांसह राष्ट्रीय व खासगी क्षेत्रातील शेकडो अग्रगण्य कंपन्यांनी थेट सहभाग घेतला होता. या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी परिसरातील शेकडो सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी मेळाव्यात हजेरी लावली, ज्यामध्ये तब्बल ५००हून अधिक युवक-युवतींनी विविध पदांच्या नोकऱ्यांसाठी आपले ऑनलाइन अर्ज अत्यंत उत्साहाने दाखल केले.

थेट कंपन्यांच्या प्रतिनिधींशी संवाद साधून तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी शोधणे यामुळे सोपे झाले. या महत्त्वपूर्ण उपक्रमाप्रसंगी आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, नगरसेवक रवींद्र भगत, नगरसेविका सायली सरक, भाजप नेते बबन बारगजे, शिवसेनेचे कळंबोली शहर अध्यक्ष तुकाराम सरक यांच्यासह राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि शिवसेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा उद्या शिवाजीनगर येथे अभीष्टचिंतन कार्यक्रम




**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त त्यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी २ जून रोजी संध्याकाळी ६.३० वाजता अभीष्टचिंतन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, माजी सभागृह नेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे व अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन शिवाजीनगर ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, पंच कमिटी, महिला मंडळ, ग्रामस्थ यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त मोफत दप्तर वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाचे औचित्य साधून रविवारी (दि. ३१) सायंकाळी ५.३० वाजता पनवेल टपाल नाका येथे मोफत दप्तर वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ॐ चैतन्य कानिफनाथ मित्र मंडळ, टपाल नाका यांच्यातर्फे हा सामाजिक उपक्रम राबवण्यात आला.

कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचप्रमाणे महापौर नितीन पाटील, नगरसेवक तथा माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह नगरसेवक राजू सोनी, सुमित झुंजारराव, अजय बहिरा, प्रथमेश सोमण, प्रवीण पाटील, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, माजी नगरसेवक अनिल भगत, जयंत पगडे आदी मान्यवर उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत हा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळावे हा दप्तर वाटपामागचा हेतू असल्याचे आयोजकांनी सांगितले. ॐ चैतन्य कानिफनाथ मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षी सामाजिक उपक्रम राबवले जातात. यंदा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त मोफत दप्तर वाटप करून सामाजिक कार्याचा वसा पुढे नेला जात आहे.



## बंबावीपाड्यात सापडलेल्या महिलेची आत्महत्याच!

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बंबावीपाडा येथे ३ मे रोजी ब्लँकेटमध्ये गुंडाळलेल्या अवस्थेत एका महिलेचा मृतदेह आढळून आला होता. सुरुवातीला हा हत्येचा प्रकार असल्याचा संशय पोलिसांना होता. त्यानुसार अनोळखी इसमाविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, तपासात त्या महिलेने आत्महत्या केल्याचे उघड झाले आहे. आता तिने आत्महत्या का केली आणि तिचा मृतदेह रस्त्यालगत कोणी आणून टाकला याचा शोध पोलीस घेत आहेत.

मृत महिलेचे नाव रुक्सार मंजूर शेख (३५) असून ती शिवाजीनगर, गोवंडी येथील रहिवासी होती. ३ मे रोजी बंबावीपाडा बस स्टॉपच्या अलीकडे रेल्वे सबवेच्या बाजूला रस्त्याच्या कडेला तिचा मृतदेह ब्लँकेटमध्ये गुंडाळलेल्या अवस्थेत आढळला. त्यानंतर पोलिसांनी तीन पथके तयार करून तपास सुरू केला. तपासादरम्यान शहर पोलिसांनी मुंबई सीएसटी, गोवंडी परिसर, मुंबई ते पनवेल रेल्वे स्टेशन, वाशी टोल नाका, जुना उरण रोड येथील सीसीटीव्ही फुटेज तपासले. एप्रिल महिन्यातील एका फुटेजमध्ये ती दिसली होती. मात्र त्यानंतर ती कुठेही आढळली नाही.

दरम्यान, शवविच्छेदन अहवालात तिची हत्या झाली नसून तिने आत्महत्या केल्याचे स्पष्ट झाले. मात्र, ती पनवेलमध्ये कशासाठी आली आणि आत्महत्येनंतर तिला ब्लँकेटमध्ये गुंडाळून बंबावीपाडा जवळ कोणी टाकले हे अद्याप गुलदस्त्यात आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक शाकीर मुसा पटेल करीत आहेत प्रेम प्रकरणातून या महिलेने आत्महत्या केली असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

यानंतर काही व्यक्तींनी तिचा मृतदेह रिक्षा किंवा इतर वाहनातून रस्त्यालगत टाकला असावा, अशी चर्चा आहे. हा प्रकार करणारे समोर आल्यावरच संपूर्ण प्रकरणाचा उलगडा होईल.



## संपादकीय

# बदलत्या हवामानाचे वास्तव

मे महिना संपून जून महिना सुरू होत असतानाही देशाच्या अनेक भागांमध्ये उष्णतेची तीव्रता कायम आहे. दुसरीकडे मान्सूनच्या आगमनाची प्रतीक्षा शेतकरी, नागरिक आणि प्रशासनाला लागून आहे. उष्णतेच्या वाढत्या लाटा आणि पावसाच्या अनिश्चिततेमुळे हवामानातील बदल आता केवळ शास्त्रीय चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर तो दैनंदिन जीवनाचा भाग बनला आहे. या बदलत्या परिस्थितीकडे भीतीने नव्हे, तर सजगतेने आणि वास्तववादी दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे.

**भारतीय जीवनपद्धतीत ऋतूंचे विशेष महत्त्व आहे. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या ऋतूंचे चक्र हजारो वर्षांपासून आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग राहिले आहे, मात्र गेल्या काही वर्षांत या ऋतूंच्या स्वरूपात लक्षणीय बदल दिसून येत आहेत. उन्हाळ्यातील तापमानाची तीव्रता वाढत असून पावसाचे स्वरूप अधिक अनिश्चित होत आहे. काही भागांत मुसळधार पाऊस पडतो, तर काही ठिकाणी पावसाची दीर्घ प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे हवामानातील बदलांचे परिणाम अधिक स्पष्टपणे जाणवू लागले आहेत. यंदाही मे महिन्यात देशातील अनेक शहरांमध्ये तापमानाने उच्चांक गाठला. उष्णतेमुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन प्रभावित झाले. वृद्ध, लहान मुले आणि बाहेर काम करणाऱ्या कामगारांना विशेष काळजी घ्यावी लागली, पण या परिस्थितीकडे केवळ संकट म्हणून पाहण्याऐवजी भविष्यासाठीची सूचना म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल, कारण वाढती उष्णता आपल्याला पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करून दाखवत आहे. दुसरीकडे सर्वांचे लक्ष मान्सूनकडे लागले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचा मोठा वाटा असून शेती मोठ्या प्रमाणात पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे मान्सूनचे आगमन, त्याचा वेग आणि वितरण याबाबत नेहमीच उत्सुकता असते. यंदा मान्सूनच्या वाटचालीबाबत विविध अंदाज व्यक्त होत असले, तरी हवामानशास्त्रातील प्रगत तंत्रज्ञानामुळे परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. त्यामुळे शेतकरी आणि प्रशासनाला योग्य वेळी आवश्यक माहिती उपलब्ध होत आहे. खरेतर हवामानातील बदल ही केवळ भारताची समस्या नाही. जगभरातील अनेक देशांना अशाच आव्हानांचा सामना करावा लागत आहे. वाढते औद्योगिकीकरण, जंगलतोड, जीवाश्म इंधनांचा वाढता वापर आणि नागरीकरण यामुळे जागतिक तापमानवाढीची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. याचे परिणाम विविध स्वरूपात दिसून येत आहेत, परंतु या परिस्थितीवर उपाय शोधण्यासाठीही जगभर प्रयत्न सुरू आहेत. अक्षय ऊर्जेचा वापर, वृक्षारोपण, जलसंवर्धन आणि शाश्वत विकासाच्या संकल्पना यामुळे सकारात्मक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. भारतानेही या दिशेने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. सौरऊर्जा, हरित ऊर्जा, पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्था आणि जलसंधारण यांसारख्या उपक्रमांवर भर दिला जात आहे. महाराष्ट्रातही जलयुक्त शिवार, वृक्षलागवड मोहिमा आणि जलसंधारण प्रकल्पांमुळे पर्यावरण संवर्धनाला चालना मिळाली आहे. अशा प्रयत्नांमुळे हवामान बदलाच्या परिणामांना काही प्रमाणात तोंड देणे शक्य होत आहे. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेती क्षेत्रातही नवीन दृष्टिकोन स्वीकारण्याची गरज आहे. कमी पाण्यावर येणारी पिके, आधुनिक सिंचन पद्धती, हवामान आधारित पीक नियोजन आणि कृषी तंत्रज्ञानाचा वापर यामुळे शेतकऱ्यांना अधिक सक्षम बनवता येईल. अनेक शेतकरी आज या नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करत आहेत, ही सकारात्मक बाब आहे. बदलत्या हवामानाचे वास्तव स्वीकारत आशावाद, विज्ञाननिष्ठता आणि जबाबदारी या त्रिसूत्रीच्या आधारे पुढे जाणे हाच या काळाचा खरा संदेश आहे.**

# अनिश्चित नैसर्गिक परिस्थिती आणि परिणाम

सध्याचे वातावरण हा प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा विषय बनला आहे. सकाळी ऊन, दुपारी ढग, संध्याकाळी पाऊस आणि रात्री गार वारा असे अनिश्चित हवामान गेल्या काही वर्षांत आपण अनुभवत आहोत. निसर्गाची ही बदलती रूपे आपल्याला अनेक गोष्टी शिकवून जातात. पृथ्वी, पाणी, हवा, अग्नी आणि आकाश या पंचमहाभूतांपासून बनलेले आपले पर्यावरण हे एकमेकांवर अवलंबून आहे. त्यातील एका घटकात जरी बदल झाला तरी त्याचा परिणाम संपूर्ण साखळीवर होतो.

गेल्या दशकभरात उन्हाळ्याचे दिवस अधिक तापदायक झाले आहेत. एप्रिल-मे महिन्यात तापमानाचा पारा ४५ अंशांपर्यंत जातो. उष्णतेच्या लाटा वाढल्या आहेत. यामुळे शेतातील पिके, जनावरे आणि माणसांचे आरोग्य यावर परिणाम होतो. त्याचवेळी पावसाचे स्वरूपही बदलले आहे. पूर्वी जून महिन्यात नियमितपणे सुरू होणारा मान्सून आता कधी लवकर तर कधी उशिरा दाखल होतो. काही भागात एकाच दिवशी अतिवृष्टी होते, तर काही ठिकाणी महिनाभर पावसाची वाट पाहावी लागते. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ या प्रत्येक भागातील पावसाचे गणित वेगळे झाले आहे. ढगफुटीसारख्या घटना अधूनमधून ऐकायला मिळतात.



हिवाळ्याचे दिवसही आता पूर्वीसारखे राहिले नाहीत. थंडीचा कडाका कमी झाला असून अवकाळी पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे हिवाळा गोंधळात टाकणारा ठरतो. उत्तर भारतात धुक्याचे प्रमाण वाढले आहे. त्याचा परिणाम वाहतुकीवर, विमानसेवेवर आणि दैनंदिन जीवनावर होतो. महाराष्ट्रातही नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये सकाळचे धुके आणि दुपारचे ऊन असा विचित्र मिलाफ अनुभवायला मिळतो. भारतीय शेती ही पूर्णपणे हवामानावर अवलंबून आहे. पावसाळा वेळेवर आला तर पेरण्या वेळेवर होतात. पण अवकाळी पाऊस, गारपीट किंवा दुष्काळ यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. रब्बी आणि खरीप हंगामाचे वेळापत्रक बदलत आहे. आंबा, काजू, द्राक्षे, संत्री यांसारख्या फळपिकांवर हवामान बदलाचा थेट परिणाम दिसतो. मोहोर लवकर येणे, फळगळ होणे, रंग न बदलणे या समस्या वाढल्या आहेत. अशा वेळी हवामान अंदाज, नवीन बियाणे आणि पाणी व्यवस्थापन यांचे महत्त्व अधोरेखित होते.

मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये तापमान वाढीबरोबरच हवेच्या गुणवत्तेचा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. दिवाळीनंतर हिवाळ्यात हवेत धूलिकण आणि धुराचे प्रमाण वाढते. सकाळी मॉर्निंग वॉकला जाणाऱ्यांना याचा त्रास होतो. उंच इमारती, काँक्रीटचे जंगल, वाहनांची संख्या यामुळे शहराचे तापमान आसपासच्या ग्रामीण भागापेक्षा २ ते ३ अंशाने जास्त असते. याला 'अर्बन हीट आयलंड' म्हणतात. रात्रीसुद्धा इमारती आणि रस्ते उष्णता सोडत असल्याने तापमान कमी होत नाही.

महाराष्ट्राला ७२० किमी लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. गेल्या काही वर्षांत अरबी समुद्रातील वादळांचे प्रमाण वाढले आहे. 'निसर्ग', 'तौक्ते', 'बिपरजॉय' सारखी चक्रीवादळे आपण अनुभवली. वादळापूर्वी हवामान विभागाकडून सूचना मिळत असल्याने पूर्वतयारी करणे शक्य होते. किनारपट्टीवरील गावांमध्ये पावसाळ्यात भरतीचे पाणी वाढण्याच्या घटनाही घडतात. खारफुटीची जंगले, वाळूचे दांडे हे नैसर्गिक संरक्षक म्हणून काम करतात. वातावरणातील बदलाचा परिणाम फक्त माणसांवरच होत नाही, तर पशु-पक्षी, कीटक, झाडे यांच्यावरही होतो. स्थलांतर करणारे पक्षी वेळेपूर्वी येतात किंवा उशिरा येतात. फुलपाखरांच्या जाती कमी होत आहेत. मधमाशांचे प्रमाण घटल्याने परागीभवनावर परिणाम होतो. जंगलातील पाणवठे आटल्याने वन्यप्राणी गावाकडे येतात. ही साखळी समजून घेणे महत्त्वाचे आहे. कारण निसर्गात प्रत्येक सजीवाचे स्थान निश्चित आहे.

वातावरण बदल हा जागतिक विषय असला तरी त्याची सुरुवात आपल्या घरापासून होते. पाणी जपून वापरणे ही काळाची गरज आहे. एक थेंबही वाया जाणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. रेन वॉटर हार्वेस्टिंग, ठिबक सिंचन यांसारख्या पद्धती उपयुक्त ठरतात. वीज वापरताना गरज नसेल तेव्हा दिवे, पंखे बंद करणे, एलईडी बल्ब वापरणे, सौर ऊर्जेचा वापर वाढवणे हे छोटे बदल मोठा फरक घडवतात. झाडे लावणे आणि जगवणे हा सर्वात सोपा आणि प्रभावी उपाय आहे. एक झाड वर्षाला २० किलो धूलिकण शोषून घेते आणि २६० पौंड ऑक्सिजन तयार करते. शाळा, महाविद्यालये, गृहनिर्माण संस्था, कार्यालये येथे वृक्षारोपणाचे उपक्रम सातत्याने राबवले पाहिजेत. देशी वड, पिंपळ, कडुनिंब, आंबा, जांभूळ यांसारखी झाडे पर्यावरणपूरक आहेत. कचरा व्यवस्थापन हीसुद्धा आपली जबाबदारी आहे. ओला कचरा आणि सुका कचरा वेगळा केला तर त्यापासून खत आणि पुनर्वापर शक्य होतो. प्लास्टिक पिशव्यांऐवजी कापडी पिशव्या वापरणे, एकदा वापरायच्या वस्तू टाळणे यामुळे कचऱ्याचे प्रमाण कमी होते. नदी, नाले, समुद्रात कचरा न टाकण्याची शपथ प्रत्येकाने घ्यायला हवी. सकारात्मक बदल आजची तरुण पिढी पर्यावरणाबाबत जागरूक आहे. शाळकरी मुले 'पर्यावरण दूत' बनून काम करत आहेत. अनेक गावांनी 'पाणी फाउंडेशन'च्या माध्यमातून जलसंधारणाची कामे केली. शहरांमध्ये सायकल चालवणे, सार्वजनिक वाहतूक वापरणे, कारपूल करणे याचे प्रमाण वाढते आहे. गच्चीवरील बाग, टेरेस फार्मिंग, घरच्या घरी भाजीपाला पिकवणे याकडे लोकांचा कल वाढला आहे. हवामान अंदाज तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांना आठवडाभराचा अंदाज मोबाईलवर मिळतो. त्यामुळे पेरणी, फवारणी, काढणीचे नियोजन करणे सोपे झाले आहे. 'डॅमिनी ॲप' सारख्या सुविधा विजांच्या पूर्वसूचना देतात. माहितीचा योग्य वापर करून आपण नुकसानीपासून वाचू शकतो.

निसर्गाने भरभरून दिले आहे. शुद्ध हवा, निर्मळ पाणी, सुपीक जमीन ही त्याची देणगी आहे. ती जपण्याची जबाबदारी सर्वांची आहे. ऋतू बदलत राहणार, ऊन-पाऊस येत राहणार. पण आपण निसर्गाशी जुळवून घेतले, त्याचा आदर केला तर जीवन सुसह्य होईल. लहान मुले, वृद्ध, आजारी व्यक्ती यांची वातावरण बदलाच्या काळात विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. उष्माघात टाळण्यासाठी पाणी पिणे, सुती कपडे वापरणे, दुपारी उन्हात न जाणे हे उपाय महत्त्वाचे ठरतात. वातावरण हे आपला आरसा आहे. निसर्गाला जे देऊ तेच तो आपल्याला परत करतो. झाडे लावली तर सावली मिळते, पाणी जपले तर दुष्काळ टळतो, हवा स्वच्छ ठेवली तर आरोग्य चांगले राहते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या परीने एक पाऊल पुढे टाकले तर उद्याचे वातावरण नक्कीच आल्हाददायक असेल.

(साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# इअरबड्सचा अतिवापर इन्फेक्शनला कारणीभूत

म्युझिक ऐकण्यासाठी वायरलेस इअरबड्स आपल्या कानात पटकन घालणे आणि ते दीर्घकाळ वापरणे हा आता एक नवीन ट्रेंड बनला आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे ३.५mm हेडफोन जॅक आता बहुतेक नवीन स्मार्टफोनमध्ये उपलब्ध नाही, यामुळे ब्लूटूथ वेअरेबल्स हा एक चांगला पर्याय आहे. मात्र, त्यांचा जास्त वापर आणि निष्काळजीपणामुळे कानाला इन्फेक्शन होऊ शकते. इअरबड्स जास्त काळ वापरण्याचे कोणते धोके आहेत आणि ते कसे टाळता येतील याकडे एक नजर टाकूया.



जास्त काळासाठी इयरबड्स वापरल्यामुळे या समस्या येऊ शकतात. बॅक्टेरिया आणि बुरशी: बॅक्टेरिया आणि बुरशी इअरबड्समध्ये जमा होऊ शकतात, ज्यामुळे कानापर्यंत पोहोचू शकते आणि इन्फेक्शन होऊ शकते.

इअरबड्स दीर्घकाळ घातल्यामुळे इयर वॅक्स जमा होऊ शकतो, ज्यामुळे ऐकण्याच्या समस्या आणि संसर्ग होऊ शकतो. त्वचेला जळजळ: काही लोकांना इयरबड्सच्या सतत वापरामुळे त्वचेवर जळजळ आणि ॲलर्जी होऊ शकते, ज्यामुळे कानात खाज सुटणे, लालसरपणा आणि सूज येऊ शकते. तुमच्या कानात वेदना, सूज किंवा खाज येत असेल किंवा कानातून रक्त स्त्राव होत असेल तर सावध व्हा. याशिवाय, तुम्हाला ऐकण्यास त्रास होत असला तरीही, इअरबड्सच्या वापराबाबत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. अशा प्रकारे तुम्ही स्वतः ला इन्फेक्शनपासून सुरक्षित ठेवू शकता. जर तुम्हाला अशा इन्फेक्शनच्या धोक्यापासून स्वतःचा बचाव करायचा असल्यास काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. इअरबड्स तयार करणाऱ्या कंपनीने दिलेल्या सूचनांनुसार इअरबड्स स्वच्छ करणे आवश्यक आहे. अस्वच्छ इअरबड्स अशा इन्फेक्शनचे प्रमुख कारण बनू शकतात. आधी तुमचे कान चांगले कोरडे करा आणि त्यानंतरच इअरबड्स वापरा. कानात ओलावा असताना इअरबड्स वापरल्यास इन्फेक्शनचा धोका वाढतो. शक्य असल्यास जास्त वेळ इअरबड्स वापरू नका. तुम्हाला कोणत्याही प्रकारची समस्या वाटत असल्यास, इअरबड वापरणे थांबवा किंवा ते बदला. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही एकापेक्षा जास्त इअरबड वापरू शकता. ते स्टोअर करण्याची जागादेखील चांगली हवी. जर इअरबड्स बराच काळ वापरायचे नसतील तर ते नीट स्वच्छ ठेवा.

# आज जागतिक दूध दिन

जागतिक दूध दिन १ जून रोजी साजरा केला जातो. जागतिक दूध दिन हा दिवस साजरा करण्यासाठी २००१ साली सुरूवात करण्यात आली. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेने याची सुरुवात केली. आपल्या आहारात ते किती महत्त्वाचे आहे. हे समजावून सांगण्यासाठी आणि आहारात दुधाचा समावेश करण्यासाठी जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो. गेल्या वर्षी जागतिक दूध दिनात ७२ देश सहभागी झाले होते. १ जून रोजी जागतिक दूध दिवस आणि २६ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय दूध दिवस भारतात साजरा केला जातो, कारण याच दिवशी १९२१ साली भारतातील श्वेतक्रांतीचे जनक आणि दूध उत्पादनाचे जनक म्हणून ओळखले जाणारे वर्गीस कुरियन यांचा जन्म झाला.

वर्गीस कुरियन कोण आहेत? वर्गीस कुरियन यांना भारतातील श्वेतक्रांतीचे जनक म्हटले जाते, त्यांना 'मिल्क मॅन' म्हणूनही स्मरले जाते, कारण त्यांच्या योगदानामुळे भारत आज दूध आयात करणारा देश बनून जगातील सर्वांत मोठ्या दूध उत्पादक देशांपैकी एक बनला आहे. कुरियन यांनी १९७०मध्ये



### निमित्त

श्वेतक्रांती सुरू केली, ज्याचा उद्देश भारतातील दूध उत्पादनाला चालना देण्यासाठी होता. १९६५ ते १९९८पर्यंत डॉ. वर्गीस कुरियन राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाचे अध्यक्ष होते आणि या काळात त्यांनी देशाच्या कानाकोपऱ्यात दूध उत्पादनाला चालना देण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न केले. त्याचाच परिणाम म्हणजे आज भारतात एवढ्या मोठ्या प्रमाणावर दुधाचे उत्पादन होत आहे.

जागतिक दूध दिनाची गरज काय? हा दिवस साजरा करणे आवश्यक आहे जेणेकरून लोकांना दुधाशी संबंधित क्रियाकलाप आणि त्याच्या व्यवसायाबद्दल जाणून घेण्याची संधी मिळेल. या दिवशी अनेक देश एकत्रितपणे जागतिक दूध दिन साजरा करतात, जे दूध हे जागतिक अन्न असल्याचे सिद्ध करते. दूध हे असे उत्पादन आहे, जे लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व वयोगटातील लोकांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. दुधाचा आहारात अनेक प्रकारे समावेश केला जाऊ शकतो, जो शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. दुधाला अमृत असे म्हणूनच म्हटले जाते. तथापि, सर्व फायद्यांसह त्याचे काही तोटेदेखील असू शकतात.

हे आठ प्रकारचे दूध खास आहे : साधारणपणे दूध गोड, गुळगुळीत, ओज व रस वाढवणारे, पित्त कमी करणारे, वीर्य, कफ वाढवणारे, जड व शीतल असते. आयुर्वेदातील आचार्यांनी मुख्यतः आठ प्रकारचे दूध सांगितले आहे. यामध्ये गाय, म्हैस, बकरी, उंट, घोडी, हत्ती, गाढव आणि स्त्री यांच्या दुधाचे विशेष वर्णन आहे. या आठपैकी स्त्रीचे म्हणजेच आईचे दूध हे सर्वश्रेष्ठ असल्याचे म्हटले आहे. यानंतर गाय आणि बकरीचे दूध अधिक फायदेशीर असल्याचे सांगण्यात आले आहे.

(साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# चमच्याऐवजी हाताने जेवण जेवल्याने आरोग्याला फायदे



हाताने खाल्ल्याने आपण काय खातो? किती खातो? आणि किती जलद गतीने खातो? या सर्व गोष्टींचा आरोग्यावर परिणाम होतो. हाताने खाल्ल्याने वात, पित्त, कफ यासारख्या आजारांवरदेखील मात करता येते.

आजकाल वेस्टन कल्चर भारतातही जास्त प्रमाणात वापरले जातं. अनेक घरांमध्ये, ऑफिसमध्ये विविध ठिकाणी जेवण्याची पद्धत बदलली आहे. व्यक्ती हाताने जेवण करणे म्हणजे अस्वच्छता समजतात आणि चमच्याने जेवण करतात, मात्र तुम्हाला माहितीये का? हाताने जेवण करणे ही फक्त भारतातील परंपरा नसून त्याचे आरोग्यालाही भन्नाट फायदे मिळतात.

आयुर्वेदीक डॉक्टर दिक्षा भवसार सावलिया यांनी याबाबत माहिती दिली आहे. आयुर्वेदात हाताने जेवण केल्याने काय फायदे होतात हे त्यांनी आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक पोस्ट शेअर करत सांगितलं आहे.

हाताने खाणे केवळ स्वच्छच नाही, तर तुमच्या इंद्रियांसाठी आणि पचनासाठी देखील फायदेशीर आहे, असं त्यांनी या पोस्टमध्ये सांगितलं आहे.

आयुर्वेदात सांगण्यात आलं आहे की, प्रत्येक बोट पाच घटकांपैकी एक घटक दर्शवते. स्थळ (अंगठा), हवा (चाफेकळी), अग्नी (मधले बोट), पाणी (मरंगळी), आणि पृथ्वी (करंगळी) जेव्हा आपण आपल्या हाताने जेवण करतो तेव्हा आपल्या हाताची तोंडाची वेगळी हालचाल होते. यातून आपल्या शरीरातील ऊर्जा संतुलित राहते. जेव्हा आपण आपल्या बोटांनी आपल्या पदार्थांना स्पर्श करतो तेव्हा आपण आपल्या मेंदूला आज्ञा देतो की, हे जेवण खाण्यासाठी मी तयार आहे. ज्यामुळे आपलं पोट आणि इतर पाचक अवयव पचन प्रक्रियेसाठी तयार होतात, अशी माहिती आयुर्वेदात दिल्याचं डॉक्टर दिक्षा भवसार सावलिया यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

हाताने खाल्ल्याने आपण काय खातो? किती खातो? आणि किती जलद गतीने खातो? या सर्व गोष्टींचा आरोग्यावर परिणाम होतो. हाताने खाल्ल्याने वात, पित्त, कफ यासारख्या आजारांवरदेखील मात करता येते.

# माणगाव परिसरात वाहतूक कोंडीने प्रवाशांना उन्हाचे चटके; महामार्गावर वाहनांच्या रांगा

**माणगाव : रामप्रहर वृत्त**

माणगाव शहर आणि परिसरात रविवारी पुन्हा एकदा भीषण वाहतूक कोंडीचा सामना प्रवासी, पर्यटक आणि स्थानिक नागरिकांना करावा लागला. माणगाव व इंदापूर येथील बायपासचे काम अद्याप अपूर्ण असल्याने निर्माण झालेल्या वाहतूक समस्येने हजारो वाहन धारक अक्षरशः तासन्तास रस्त्यावर अडकून पडले होते.



कडक उन्हात वृद्ध, महिला आणि लहान मुलांचे मोठे हाल झाले असून शासन आणि संबंधित ठेकेदारांच्या निष्क्रियतेबद्दल नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

शनिवारी सकाळ पासूनच मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांची प्रचंड गर्दी वाढू लागली. माणगाव शहरातून जाणाऱ्या मुख्य मार्गावर वाहतुकीचा ताण इतका वाढला की मुंबई आणि महाड या दोन्ही दिशांना तब्बल सहा किलोमीटर पर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या.याशिवाय ताम्हिणी घाटमार्गे पुण्याकडून कोकणात जाणाऱ्या वाहनांचीही संख्या लक्षणीय असल्याने माणगाव-निजामपूर मार्गावर सुमारे चार किलोमीटर पर्यंत वाहतूक ठप्प झाली होती. वाहतूक कोंडीत अडकलेल्या अनेक वाहनांमध्ये वृद्ध नागरिक, महिला, लहान मुले आणि पर्यटक होते. उन्हाच्या तीव्र झळांमुळे अनेकांना त्रास सहन करावा लागला.

काही वाहनांमधील प्रवाशांकडे पुरेसे पाणीही उपलब्ध नसल्याने त्यांची गैरसोय झाली. सुट्टीचा आनंद घेण्यासाठी कोकणात निघालेल्या पर्यटकांचा प्रवास मात्र या कोंडीमुळे त्रासदायक ठरला. दरम्यान, वाहतूक सुरळीत करण्यासाठी वाहतूक पोलीस शाखा, माणगाव पोलीस ठाण्याचे कर्मचारी तसेच होमगार्ड यांनी दिवसभर प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

विविध चौकांमध्ये पोलिसानी वाहतुकीचे नियमन करून कोंडी फोडण्याचे प्रयत्न करण्यात आले. सायंकाळच्या सुमारास वाहतूक काही प्रमाणात सुरळीत झाली असली तरी हा केवळ तात्पुरता दिलासा असल्याची भावना अनेक नागरिकांनी यावेळी व्यक्त केली.

## मंत्री भरत गोगावले यांच्या वाढदिवसानिमित्त फळवाटप

**माणगाव : बातमीदार**

महाराष्ट्राचे लोकप्रिय कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले साहेब यांचे ६३व्या वाढदिवसाचे औचित्य साधून जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांचे मार्गदर्शनाखाली युवासेना तालुका संपर्क प्रमुख संतोष पोळेकर यांचे नियोजनाने माऊली वृद्धाश्रम बोरवाडी येथे धान्य वाटप व फळ वाटप कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी अ‍ॅड.अच्युत तोंडळेकर-जिल्हासचिव युवासेना, मनोज सावंत विभागप्रमुख, शलाका पाटील, गणेश समेळ, नितीन पवार तालुका समन्व्यक, अनिल मोरे, सोमेश देवघरे संपर्क प्रमुख निजामपूर, राजेश कदम, प्रमोद खेतम ,सरपंच, कृष्णा सुतार उपसरपंच, निलेश पाकड, बाबू पाकड, बोरवाडी ग्रामस्थ, माऊली आश्रम व्यवस्थापक यावेळी उपस्थित होते.



# मंत्री भरत गोगावले यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून तालुका युवासेनेतर्फे रक्तदान शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रक्त पिढ्यांमधील रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी काळाची गरज ओळखून रक्तदान हेच खरे सर्व श्रेष्ठ दान समजून राज्याचे रोजगार हमी योजना,फलोत्पादन व खारभूमी विकासमंत्री ना.भरत गोगावले यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार दि. ३१ मे रोजी मोतीराम प्लाझा बँक्वेट हॉल,माणगाव येथे शासकीय रक्तपेढी अलिबाग यांच्या सौजन्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.




सदर शिबिराचे उदघाटन सकाळी ९:३० वा. ना.भरत गोगावले यांच्याहस्ते व शिवसेनेचे संपर्कप्रमुख अरुण चाळके,जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर,राजिपचे अर्थ व बांधकाम समिती सभापती चंद्रकांत कळंबे,जिल्हा युवसेनाप्रमुख विपुल उभारे,तालुकाप्रमुख अ‍ॅड.महेंद्र माणकर,शासकीय रुग्णालय अलिबाग रक्तपेढीचे डॉ.दिपक गोसावी,माणगाव शहर संपर्कप्रमुख प्रसाद धारिया,शहर प्रमुख नितीन दसवते,माजी सरपंच अनंता थळकर, प्रवीण बागवे,सौरभ खैरे,तालुका युवासेनाप्रमुख ज्ञानेश्वर उतेकर व युवासेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या शिबिरात नवनिर्वाचित रायगड जिल्हापरिषद सदस्य अविनाश नलावडे,तालुका युवासेनाप्रमुख ज्ञानेश्वर उतेकर यांच्यासह ४२ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून उत्साहात शिबीर संपन्न झाले.

सदर शिबिराच्या उदघाटनप्रसंगी उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांनी तालुका युवासेनेने रक्तदान हि काळाची गरज ओळखून ना.भरत गोगावले यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन केल्याने आयोजकांचे विशेष कौतुक केले. या शिबिरास माणगाव पंचायत समितीचे माजी सभापती सुजित शिंदे,युवासेना संपर्कप्रमुख रमेश देशपांडे,माजी विभागप्रमुख कोंडू फाळके,उपशहरप्रमुख फैमिद जामदार,प्रसाद देवळेकर यांनीही भेट देऊन आयोजकांचे भरभरून कौतुक केले.

यावेळी शिबिरास भेट देण्यासाठी आलेल्या सर्व मान्यवरांचे तसेच रक्तदात्यांचे माणगाव तालुका युवासेनेतर्फे युवासेनाप्रमुख ज्ञानेश्वर उतेकर व सहकाऱ्यांनी स्वागत केले.

सदर शिबीर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शासकीय रक्तपेढी अलिबागचे डॉ.दिपक गोसावी,त्यांचे सहकारी हेमकांत सोनार,वैभव कांबळे,गणेश भोये,मनोहर अडस,सुशांत भगत यांनी रक्त संकलनाचे काम पाहून माणगाव तालुका युवासेना प्रमुख ज्ञानेश्वर उतेकर,दिनेश टेंबे,रफिक परदेशी,देवेंद्र बामुगडे,प्रफुल खरंगटे,अल्पेश उतेकर यांच्यासह तालुका व शहर युवासेनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सुतारवाडीत राष्ट्रवादी काँग्रेसची शक्ति प्रदर्शनात्मक विस्तारित कार्यकारिणी बैठक

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सुतारवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विस्तारित जिल्हा कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी दि. (३१) रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व विधान परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आयोजित या बैठकीत पक्ष संघटना अधिक सक्षम, सशक्त आणि तळागाळापर्यंत बळकट करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.



यावेळी युवा नेतृत्वाला प्राधान्य देत प्रमोद म्हसकर यांच्यावर पेण विधानसभा कार्याध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. तसेच सामंत यांच्यावर पनवेल, उरण आणि कर्जत परिसरातील युवक संघटनेची जबाबदारी सुपूर्द करण्यात आली . युवकांना अधिकाधिक संधी देत सक्षम नेतृत्वाची नवी फळी उभी करण्याचा पक्षाचा मानस असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. बैठकीस राज्याच्या मंत्री आदिती तटकरे, विधान परिषद उमेदवार अनिकेत तटकरे, जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, महिला जिल्हाध्यक्ष उमाताई मुंडे, स्नेहल जगताप, नगराध्यक्षा वनश्री शेडगे, मुरुड नगराध्यक्षा आराधना दांडेकर, राज्य प्रवया अ‍ॅड. सायली दळवी यांच्यासह पक्षाचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी व नेते उपस्थित होते. याशिवाय जिल्हा परिषद सदस्य, नगराध्यक्ष, नगरसेवक आणि विविध स्तरांवरील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

बैठकीत मार्गदर्शन करताना खासदार सुनील तटकरे यांनी संघटनाच पक्षाची खरी ताकद असल्याचे सांगितले. कार्यकर्त्यांनी गावागावांत जाऊन जनसंपर्क वाढवावा, पक्षाची धोरणे व विकासकामे जनतेपर्यंत पोहोचवावीत आणि संघटनात्मक कामात अधिक सक्रिय व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

आगामी विधान परिषद निवडणुकीत महायुती राज्यातील सर्व १७ जागांवर विजय मिळवेल, असा विश्वास व्यक्त करताना तटकरे यांनी अनिकेत तटकरे यांच्या विजयासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. पक्षाला आव्हानात्मक काळात भक्कम पाठिंबा देणाऱ्या कार्यकर्त्यांचे त्यांनी विशेष आभार मानले. विविध स्तरांवरून झालेल्या टीकेलाही त्यांनी आपल्या खास शैलीत उत्तर देत कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण केले.

सध्या सुरू असलेल्या मतदार यादी पुनर्निरीक्षण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक मतदान केंद्रावर पक्षाचे अधिकृत प्रतिनिधी नियुक्त करण्यात येणार असल्याची माहितीही खासदार तटकरे यांनी दिली. जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या स्वाक्षरीने संबंधित प्रतिनिधींची नावे निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना तटकरे यांनी राज्यातील राजकीय घडामोडींवर भाष्य केले.

## एनडी स्टुडिओत सुरक्षारक्षकाचा अकस्मात मृत्यू

**खोपोली : प्रतिनिधी**

एनडी स्टुडिओत सुरक्षा रक्षक म्हणून काम करणारे बारकू बामा तरे वय ६३ रा. हातनोली खालापूर यांचा अकस्मात मृत्यू झाल्याची घटना रविवारी सकाळी घडली.

बारकू तरे रविवारी स्टुडिओत ड्युटीवर असताना सकाळी साडेदहाच्या सुमारास अचानक चक्कर येऊन कोसळले .त्यांना तातडीने चौक येथील खाजगी रुग्णालयात उपचाराकरता दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांची तपासणी करून त्यांचा हृदयविकाराचा झटका आल्याने मृत्यू झाल्याचे घोषित केले.

त्यांचा मृतदेह चौक ग्रामीण रुग्णालय येथे शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून घटनेची माहिती बारकू यांचा मुलगा भूषण याने खालापूर पोलीस ठाण्यात दिली आहे.

## खालापुरातील धामणी गावात हाणामारी; परस्परविरोधी तक्रार दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

धामणी गावाच्या हद्दीत असलेल्या प्रभास कारखान्याच्या प्रवेशद्वारावर राकेश प्रभाकर चिले वय ४० रा. धामणी यांना तानाजी पिंगळे, शैला पिंगळे आणि पृथ्वी पिंगळे सर्व रा. धामणी यांनी

काठीने मारहाण करत त्यांच्या कारचे नुकसान करत लाख रुपये चोरी करून नेल्याची तक्रार चिले यांनी खालापूर पोलीस ठाण्यात दिली आहे. तर प्रभात कारखान्यासमोर वडापाव व चहा विक्रीची कॅन्टीन समोर शैला पिंगळे यांना राकेश चिले यांनी अश्लील शिवीगाळी व दमदाटी केली तसेच तानाजी याना गळपटटी पकडुन गाडीमध्ये खेचुन पंधरा फुट लांब फरफटत नेवुन दुखापत केल्याची तक्रार पिंगळे यांनी दिली आहे.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार एस शेळके हे करीत आहेत.

# वासांबे ग्रामपंचायतीची फिनिक्स भरारी; बरखास्त ते देशात अव्वल

**खोपोली : प्रतिनिधी**

बरखास्ती ते आत्मनिर्भर पंचायत पुरस्कारात भारतात प्रथम अशी झेप घेतलेल्या वासांबे ग्रामपंचायतीचा आदर्श इतर ग्रामपंचायतीने देखील घेण्यासारखा आहे.



तीन वर्षांपूर्वी आर्थिक व प्रशासकीय अनियमितेत थेट सहभाग असल्याचे सिद्ध झाल्यामुळे वासांबे ग्रामपंचायतचे उपसरपंच व सर्व सदस्य यांना पदावरून दूर करण्याचे आदेश तत्कालीन विभागीय आयुक्त कोकण विभाग डॉक्टर महेंद्र कल्याणकर यांनी दिले होते. तालुक्यातील सर्वाधिक महसुली उत्पन्न असलेली ग्रामपंचायत म्हणून वासांबे ग्रामपंचायत परिचित आहे. औद्योगीकरण वेशीवर असल्यामुळे मोठ्या प्रमाणात आलेली सुबत्ता यामुळे ग्रामपंचायत कारभारात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात बोकाळला होता. या भ्रष्टाचाराला संतोष विचारे यांनी माहितीच्या अधिकारातून वाचा फोडली होती. संतोष विचारे यांच्या तक्रारी अर्जाची गटविकास अधिकारी खालापूर यांनी चौकशी करून अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद रायगड यांना सादर केल्यावर तीन वर्षांपूर्वी सतरा सदस्य बरखास्त झाले होते.

पंचायतीने कर्मचारी नेमणूक करताना ग्रामविकास विभागाकडील परिपत्रकाचे पालन केले नव्हते. त्यामुळे ग्रामपंचायतचे आर्थिक नुकसान झालेले आढळून आले सरकारी जागेत अतिक्रमण करून अनधिकृत बांधकामे केलेले असताना ग्रामपंचायतीने कोणतीही कारवाई न करता बांधकामाच्या नोंदी ग्रामपंचायत असेसमेंट रजिस्टरला घेतल्याचे दिसून आले. ग्रामपंचायत हद्दीमधील इमारतीचे बांधकामाचे प्लॅन नगर रचना रायगड यांच्याकडून मंजूर झाल्याची खात्री न करता बांधकामास परवानगी व कर आकारणी बाबत मासिक सभेत ठराव मंजूर करून शासनाच्या नियमाचे उल्लंघन करण्यात आले.

ग्रामनिधीतून महिला व बालकल्याण खर्च दिव्यांग कल्याण खर्च, मागासवर्गीय खर्च करणे ग्रामपंचायतीवर बंधनकारक असताना देखील त्या त्यावर्षी शासनाच्या पूर्ण मार्गदर्शक सूचनाप्रमाणे पूर्ण रक्कम खर्च न केल्याने मोठ्या प्रमाणे अनुशेष शिल्लक ठेवून शासनाच्या तरतूचे उल्लंघन केल्याचे आढळून आले. ग्रामपंचायत विकास कामे करताना पेपर निविदा व ई निविदा प्रक्रियेचा अवलंब करण्यात आल्या नसल्याचे देखील चौकशीत उघड झाले आहे.

विभागीय आयुक्त कोकण यांनी उपसरपंच सर्व सदस्यांना पदावरून दूर करण्याचे आदेश दिले होते. याप्रकरणी तीन ग्रामसेवकांची देखील चौकशी सुरू होती. त्यानंतर झालेल्या थेट निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या उमा मुंडे थेट सरपंच पदी निवडून आल्या आणि ग्रामपंचायत प्रशासनाला शिस्त लागली. कामात त्यांनी आणलेला पारदर्शीपणा त्यामुळेच वासंबे ग्रामपंचायत व लागलेला कलंक पुसला गेला आहे. अशाच प्रकारची कामगिरी सातत्य ठेवण्याचे आव्हान उमा मुंडे यांच्यापुढे असणार आहे.


**KONKAN GYANPEETH**
**URAN COLLEGE OF COMMERCE AND ARTS**
**Run, Operate and Manage by Kapil Patil Educationl Institute**
Permanently Affiliated to University of Mumbai,
Re-Accredited with 'B' Grade by NAAC, u.s.2(f) & 12(B) by U.G.C.
Near Tahsil Office, Uran, Raigad Maharashtra, 400 702 Contact No. 022 - 27220376 / 27221567
Email :- uran_college@rediffmail.com / kguc7star@gmail.com Web site- www.kguc.org

**Applications are invited from eligible candidates for appointment to the following full-time teaching post(s) in the Un-aided Courses for the academic year 2026–27.**

| Sr. No. | Cadre | Subject | No. of Posts |
|---|---|---|---|
| 1 | Assistant Professor | Accountancy | 01 |
| 2 | Assistant Professor | Commerce | 02 |
| 3 | Assistant Professor | Economics | 01 |
| 4 | Assistant Professor | History | 01 |
| 5 | Assistant Professor | Geography | 01 |
| 3 | Assistant Professor | B.Com (Accounting & Finance) | 05 |
| 4 | Assistant Professor | M.Com. (Commerce) (PG) | 03 |
| 5 | Assistant Professor | M.A. (Economics) (PG) | 03 |

The above posts are open to all; however candidates from any category can apply for the post.

Candidates having knowledge of Marathi will be preferred.

**The required minimum qualifications for the post of Assistant Professor in Arts & Commerce.**

1. A Master's degree with 55% marks (or an equivalent grade in a point-scale wherever the grading system is followed) in the relevant or as subject equivalent degree from an Indian /foreign university.

2. Besides fulfilling the above qualifications, the candidates must have cleared the National Eligibility Test (NET) conducted by the UGC / CSIR, or a similar test accredited by the UGC, like SET or who are or have been awarded a Ph.D. Degree in accordance with the University Grants Commission (Minimum Standard and Procedure for Award of M.Phil./ Ph.D Degree) Regulations, 2009 or 2016 and their amendments from time to time as the case, may be exempted from NET/SET:

Provided further, candidates registered for the Ph.D. Programme prior to July, 11, 2009, shall be governed by the provisions of the then existing Ordinances/Bye laws/Regulations of the Institution awarding the degree and such Ph.D. candidates shall be exempted from the recruitment requirements of NET/SET for and appointment of Assistant Professor or equivalent positions.

Application with full details should reach the Application with full details should reach **The Principal, Konkan Gyanpeeth, Uran College of Commerce & Arts, Near Tahsil office, Tal- Uran, Dist-Raigad, Pin- 400 702..** Within 07 days from the date of publication of this advertisement.

Sd/-
**Principal**
**KONKAN GYANPEETH**
**URAN COLLEGE OF COMMERCE AND ARTS**



SHRI KARAN KHARAT
Advocate for Applicant

PUBLIC NOTICE

N.D.08/06/28
N-8
Civil M. A. No. 1416 of 2025

**In the court of the Civil Judge S.D. Panvel**
**At Panvel**

Mr. Rikil Surendra Shah
R/at:Flat No.B/501, 5th Floor,
Advent Neel Residency, ............. Applicant
Behind Poorna Pradnya School,
Bharucha Road, Dahisar-East,
Mumbai-400068, Maharashtra

V/s

Smt. Ila Surendra Shah
R/at:Flat No.B/501, 5th Floor,
Advent Neel Residency, ............. Opponent
Behind Poorna Pradnya School,
Bharucha Road, Dahisar-East,
Mumbai-400068, Maharashtra

Whereas the applicant above named herein has filed an application before this court for grant of the Heirship Certificate in respect of the immoveable property, as described in the schedule hereunder, left by his deceased grand-father SHRI MANGALDAS NARSHIDAS SHAH, WHO EXPIRED ON:13.08.2025 AT MUMBAI.

And whereas if any person has any right, title, interest, or share etc. of any nature whatsoever in the scheduled property, is/are hereby invited to submit his/her/their objection in this court within the period of **30 days** from the date of the publication of this public notice.

SCHEDULE OF THE PROPERTY

ALL THAT PIECE AND PARCEL OF landed property, viz.

| Village Name | Survey No. No./Hissa | Area admeasuring Hector-Are-Prati | Akar Rs. - Paise |
|---|---|---|---|
| Mouje Pashane, Tal. Karjat, Dist. Raigad | 146/7/9/A | 0-26-00 Pot Kharaba 0-09-00 Total 0-35-00 | 0-11 |

Standing in the name of the deceased **Shri Mangaldas Narshidas Shah**

AS SUCH if nothing is received within the stipulated period of 30 days from the date of the publication of this public notice, the application of the applicant shall be proceeded further and the appropriate orders may be passed.

Given under my hand and seal of this court on this D : 30.5.26

Court

SD/-
Superintendent
Civil Court S.D. Panvel

# नवी मुंबई महापालिकेचा विक्रम

## दोन महिन्यांत १०० कोटींची मालमत्ता करवसुली



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुरू असलेल्या करवसुली मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. १ एप्रिल २०२६ ते ३० मे २०२६ या दोन महिन्यांतच १०० कोटींपेक्षा अधिक मालमत्ता कर वसूल झाला आहे. महापालिकेच्या स्थापनेपासून प्रथमच आर्थिक वर्षाच्या सुरुवातीच्या दोन महिन्यांत १०० कोटींचा टप्पा ओलांडला गेला आहे.३० मे २०२६ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत मालमत्ता करापोटी १०१ कोटी १० लाख रुपयांची वसुली झाली.

यापैकी ऑनलाइन माध्यमातून ८० कोटी, बँक व्यवहारातून १९ कोटी, तर ऑफलाईन पद्धतीने दोन कोटी रुपयांचा भरणा झाला आहे. नागरिकांनी क्यू आर कोड, यूपीआय, नेट बँकिंग, डेबिट/क्रेडिट कार्ड, मोबाईल बँकिंग या डिजिटल पर्यायांना मोठी पसंती दिली आहे.निवासी मालमत्तांमधून २९.५२ कोटी, अनिवासी मालमत्तांमधून २४.८५ कोटी आणि औद्योगिक मालमत्तांमधून ४१.२१ कोटी रुपये जमा झाले आहेत. एकूण ३,५४,७३७ करदात्यांपैकी आतापर्यंत ५६,१६६ नागरिकांनी कर भरला आहे. महापालिकेने नागरिकांसाठी मालमत्ता कर बिल ऑनलाइन उपलब्ध केले आहे.

अधिकृत संकेतस्थळ www.nmmc.gov.in तसेच व्हॉट्सअॅप चॅटबॉट ८२९१९२०५०४ या क्रमांकावरूनही बिल मिळवता येते. चॅटबॉटसाठी ८२९१९२०५०४ या क्रमांकावर "Hi" असा संदेश पाठवून मालमत्ता क्रमांक नोंदवावा. लगेच मोबाईलवर बिल उपलब्ध होते.नागरिकांच्या सोयीसाठी मालमत्तेशी मोबाईल क्रमांक लिंक करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. यामुळे बिल, सूचना व महत्त्वाची माहिती थेट मोबाइलवर मिळते. www.nmmc.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.'मालमत्ता कर' या पर्यायावर क्लिक करून १२ अंकी मालमत्ता क्रमांक नोंदवा.'अपडेट' वर क्लिक करा. मोबाइल क्रमांक टाकून 'रिक्वेस्ट ओटीपी'वर क्लिक करा. ओटीपी टाकून 'सबमिट' करा. ३० जून २०२६ पूर्वी मालमत्ता कर भरून अतिरिक्त २ टक्के अधिभार टाळावा, असे आवाहन मालमत्ता कर विभागाने केले आहे.

नवी मुंबईकरांनी दिलेला प्रतिसाद पालिकेच्या पारदर्शक प्रशासनावरील विश्वास दर्शवतो. क्यूआर कोड, यूपीआय, व्हॉट्सअॅप चॅटबॉटमुळे कर भरणे सुलभ झाले. मे महिन्यात प्रथमच १०० कोटींपेक्षा अधिक कर संकलन होणे अभिमानाची बाब आहे, असे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सांगितले.

# प्रकल्पग्रस्तांच्या घरांना कायमस्वरूपी मान्यता मिळवून देणार -आ. मंदा म्हात्रे



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेल्या घरांना कायमस्वरूपी मान्यता मिळावी, या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या महत्त्वाच्या प्रश्नासंदर्भात आमदार मंदा म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत प्रकल्पग्रस्तांच्या न्यायहक्कांसाठी एकत्रित लढा देण्याचा निर्धार आमदार मंदा म्हात्रे यांनी व्यक्त केला. यावेळी प्रकल्पग्रस्त बांधवांच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत प्रकल्पग्रस्तांच्या घरांशी संबंधित अडचणी सोडवून न्याय देण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्याची भूमिका उपस्थित प्रकल्पग्रस्त नेत्यांनी मांडली. स्थानिकांच्या न्याय्य हक्कांसाठी एकत्रितपणे पाठपुरावा करण्याचा निर्धार करण्यात आला. यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या अपेक्षांना नवी दिशा मिळाली असून, अधिक प्रभावीपणे लढा उभारण्याचा संकल्प करण्यात आला. प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांबाबत यंत्रणांकडे सातत्याने पाठपुरावा करण्यावरही भर देण्यात आला.

यावेळी सेवानिवृत्त सिडको सहाय्यक लेखा अधिकारी दिलीप वैद्य यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बैठकीस माजी विरोधी पक्षनेते पंढरीनाथ पाटील, नगरसेवक द्वारकानाथ भोईर, नगरसेवक शिवराम पाटील, भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, भाजप नेते निलेश म्हात्रे यांच्यासह विजय घाटे, रमाकांत पाटील, गुणाबाई सुतार आणि मोठ्या संख्येने नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त बांधव उपस्थित होते.

## सुरक्षारक्षक शंकर घाग यांचा निरोप समारंभ



**नवी मुंबई : बातमीदार**

शासकीय सेवेतून वयोमर्यादेनुसार अनेकजण सेवानिवृत्त होतात. त्यांचा निरोप समारंभ सहसा कार्यालयातील सभागृहात होतो. मात्र, कर्मचारी ज्या ठिकाणी कर्तव्य बजावत असतो, त्याच ठिकाणी निसर्गाच्या सावलीत सेवानिवृत्तीचा सोहळा होणे भाग्यदायक आणि अद्वितीय आहे, असे मनोगत नवी मुंबईचे उपमहापौर दशरथ भगत यांनी व्यक्त केले. सिडकोच्या सुरक्षा युनिटमधील महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक महामंडळातील सुरक्षा रक्षक शंकर घाग यांच्या निरोप समारंभात बेलापूर येथे ते बोलत होते.

राज्य शासनाच्या अखत्यारितील महाराष्ट्र सुरक्षा रक्षक महामंडळात ३१ वर्षे कर्तव्यदक्ष सेवा बजावल्यानंतर शंकरराव घाग ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांचा निरोप समारंभ खारघर हिल्स येथील प्रवेशद्वारावर, एण्ट्री पॉइंटजवळ निसर्गाच्या सानिध्यात संपन्न झाला. या प्रसंगी उपमहापौर दशरथ भगत यांच्यासह राजकीय, सामाजिक, पत्रकारिता, व्यापार-उद्योग क्षेत्रातील मान्यवर, पर्यावरणप्रेमी नागरिक, तसेच सिडको व सुरक्षा रक्षक मंडळातील ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. शंकर घाग यांचे कुटुंबीय व नातेवाईकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोरबे धरणातील पाणी शुद्धच

महापौर सुजाता पाटील यांनी स्वतः पाणी पिऊन दिला निर्वाळा



**नवी मुंबई : बातमीदार**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणातील पाण्याची पातळी उन्हामुळे खालावली आहे. यंदा पावसाला उशीर होण्याची शक्यता असल्याने जलनियोजनासाठी १० टक्के पाणीकपात लागू करण्यात आली आहे. दरम्यान, चार दिवसांपूर्वी काही ठिकाणी दूषित पाणी येत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून आल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर महापौर सुजाता पाटील यांनी शनिवारी (दि. ३०) मोरबे धरणाला भेट दिली. महापौरांनी स्वतः मोरबे धरणाचे पाणी पिऊन नागरिकांना दूषित पाणीपुरवठा होत नसल्याचा निर्वाळा दिला.

नागरिकांनी घाबरून जाऊ नये, पाण्याचा अपव्यय टाळून काटकसरीने वापर करावा, असे त्यांनी सांगितले. तसेच सोसायट्यांनी आपल्या टाक्या स्वच्छ करून घ्याव्यात, असे आवाहन महापौर सुजाता पाटील यांनी केले. मोरबे धरणाची कमाल पातळी ८८ मीटर असून सध्या ७२ मीटर पाणीपातळी आहे. यंदा पाण्याची पातळी खालावल्याने धरणात जुलैअखेरपर्यंत पुरेल इतकाच साठा शिल्लक आहे. त्यामुळे गाड्या धुणे, पाणी वाया घालवणे असा बेसुमार वापर करू नये, अन्यथा कठोर भूमिका घ्यावी लागेल, असे संकेत महापौरांनी दिले. मागील आठवड्यात पाणी गढूळ येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

त्याची दखल घेत ६५० हून अधिक पाणी नमुने घेऊन शुद्धता तपासण्यात आली. यात पाणी स्वच्छ व पिण्यायोग्य असल्याचे आढळले. आठवड्यात दोन दिवस शटडाऊन घेतल्याने पाइपलाइनमधील बारीक गाळ व पाइपला चिकटलेले मातीचे कण पाणीपुरवठा पूर्ववत सुरू झाल्यानंतर काही काळ पाणी गढूळ आले. त्यामुळे नागरिकांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याचा दावा महापौरांनी फेटाळला. गढूळ पाण्याच्या तक्रारींचे तत्काळ निवारण करावे, असे निर्देश महापौरांनी बैठकीत दिले.

> **मोरबे धरणाची जलसाठ्याची पातळी उन्हामुळे १७ मीटरने खालावली आहे. नागरिकांना जुलैअखेरपर्यंत पुरेल इतका पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे नवी मुंबईकरांना जरी हक्काच्या मोरबे धरणातून पुरवठा होत असला तरी संभाव्य परिस्थिती लक्षात घेता पाण्याचा वापर जपून करावा. ज्या सोसायट्यांना पाण्याच्या टाक्या आहेत त्यांनी टाक्या साफ करून घ्याव्यात. प्रशासनाला सहकार्य करावे.**
> **-सुजाता पाटील, महापौर**

## निवडक

### अपघातात तरुणाचा मृत्यू

**नवीन पनवेल** : मोटरसायकलने अज्ञात वाहनाला पाठीमागून धडक दिल्याने रोशन सुरेश मानकुमरे (२१, रा. कावडी, जावळी, सातारा) याचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात २९ मे रोजी करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार २९ मे रोजी मध्यरात्री दोनच्या सुमारास रोशन हा केटीएम आरसी मोटारसायकल क्र. एमएच ४७ एपी ९५४५ घेऊन मुंबई-पुणे एक्सप्रेस वेच्या पुण्याकडे जाणाऱ्या लेनवर भाताण येथून जात होता. दुचाकीला प्रवेशबंदी असतानाही तो तेथून जात असताना अज्ञात वाहनाला पाठीमागून धडकला. या अपघातात तो गंभीर जखमी झाला. त्याला एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

### विवाहिता बेपत्ता

**पनवेल** : शहरातील गणेशनगर झोपडपट्टी परिसरातून एक विवाहिता बेपत्ता झाल्याची घटना घडली. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. मनुका लक्ष्मण राठोड (२५) असे बेपत्ता महिलेचे नाव आहे. तिची उंची ५ फूट, केस काळे, चेहरा गोल आहे. बेपत्ता होताना तिने राखाडी रंगाची साडी परिधान केली होती. तिच्याकडे कापडी पिशवी व आकाशी रंगाचा कार्बन कंपनीचा मोबाइल आहे. तिला मराठी, गोरमाटी आणि हिंदी भाषा येते. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक नामदेव पडळकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### घरात घुसून चोरी

**पनवेल** : खारघर येथे अनोळखी महिलेने घरात प्रवेश करून २९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तमन्ना रघुवंशी या खारघर येथे राहतात. अनोळखी महिलेने त्यांच्या घराच्या दाराची कडी काढून आत प्रवेश केला आणि सुटकेसमधील २९ ग्रॅम वजनाचे दागिने चोरून नेले.

### आनंथ वाकचौरे यांना 'डॉक्टरेट'

**नवी मुंबई** : वैदिक अंकशास्त्र, ज्योतिषशास्त्र, क्रिस्टल विश्लेषण आणि अध्यात्मिक मार्गदर्शन क्षेत्रातील अभ्यासक आनंथ वाकचौरे यांना लूशियाना रिसर्च युनिव्हर्सिटीकडून मानद डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. पुणे येथे आयोजित विशेष पदवीदान समारंभात हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. आध्यात्मिक अंकशास्त्र व गूढ विद्याशास्त्र क्षेत्रातील संशोधन, समाजोपयोगी मार्गदर्शन आणि सकारात्मक कार्याची दखल घेत विद्यापीठाने त्यांना या मानद डॉक्टरेटने गौरविले आहे. आनंथ वाकचौरे यांनी विविध स्तरांतील लोकांना मार्गदर्शन केले आहे.

## दिघोडेत संत निरंकारी मिशनचा सत्संग उत्साहात

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील दिघोडे येथे संत निरंकारी मिशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेला विशाल संत निरंकारी सत्संग कार्यक्रम भक्तिमय वातावरणात आणि उत्साहपूर्ण उपस्थितीत संपन्न झाला. ज्ञानप्रचारक परमपूज्य विश्वास भोसले (मुंबई) यांच्या सानिध्यात पार पडलेल्या या कार्यक्रमाला परिसरातील शेकडो भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमस्थळी सेवा दलाच्या स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने वाहतूक नियंत्रण, बैठक व्यवस्था तसेच पिण्याच्या पाण्याची उत्कृष्ट सुविधा उपलब्ध करून दिली होती.

संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला होता.सत्संगाची सुरुवात निरंकारी भाविकांनी सादर केलेल्या मधुर भक्तीगीतांनी झाली. त्यानंतर संत महात्म्यांनी अध्यात्म, मानवता, प्रेमभाव आणि समाजातील ऐक्य यावर प्रभावी मार्गदर्शन केले. 'ईश्वर एक आहे आणि मानव सेवा हीच खरी भक्ती आहे,' असा मानवतेचा संदेश यावेळी देण्यात आला.आजच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनात सकारात्मक विचार, सद्गुरूंचे ज्ञान आणि मानवतेची भावना समाजाला योग्य दिशा देऊ शकते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. समाजातील वाढते मतभेद, व्यसनाधीनता आणि तणाव दूर करण्यासाठी अध्यात्माची गरज असल्याचे संत महात्म्यांनी सांगितले.

सत्संगामध्ये महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग दिसून आला. भाविकांनी सत्संगामुळे जीवनात घडलेल्या सकारात्मक बदलांचे अनुभव व्यक्त करत आत्मिक समाधानाची भावना मांडली. यावेळी संत निरंकारी मिशनच्या आगामी सामाजिक व आध्यात्मिक उपक्रमांची घोषणा करण्यात आली. भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाची सांगता सर्व उपस्थितांना महाप्रसाद वितरणाने करण्यात आली. कार्यक्रमास आयोजक दत्ताराम पाटील, संत निरंकारी सत्संग उरण सेक्टर १९ चे संयोजक कुलदीप जयवंत म्हात्रे, संत निरंकारी सत्संग दिघोडेचे काशिनाथ कासकर, चंद्रकांत म्हात्रे, हरिदास पाटील, सचिन पाटील यांच्यासह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






**पनवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मन की बात कार्यक्रमाचे रविवारी भाजप परिवारातील सहकारी पदाधिकाऱ्यांनी थेट प्रक्षेपण ऐकले. देशवासीयांच्या प्रेरणादायी यशोगाथा, जनसहभाग आणि विकसित भारताचा संकल्प मांडणारा हा कार्यक्रम केवळ संवाद नसून सकारात्मकता व राष्ट्रनिर्मितीची भावना रुजवणारे प्रभावी माध्यम आहे. आमदार महेश बालदी तसेच कौशिक शाह यांनी उरण विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह हा कार्यक्रम उत्साहाने श्रवण केला.**



**पनवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी आपल्या मासिक रेडिओ कार्यक्रम मन की बातच्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधला. यावेळच्या भागात त्यांनी देशभरातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे विशेष कौतुक केले. शेतकऱ्यांचे अथक परिश्रम आणि समर्पणामुळेच फळांचा राजा असलेला आंबा दरवर्षी लाखो कुटुंबांपर्यंत पोहचतो, अशा शब्दांत पंतप्रधानांनी शेतकऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. देशाच्या कानाकोपऱ्यात ऐकल्या गेलेल्या या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाचे शेलघर येथील भारतीय जनता पक्षाचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या निवासस्थानी आयोजन करण्यात आले होते. या थेट प्रक्षेपणावेळी माजी उपसरपंच विजय घरत, जयवंत देशमुख, अमृत भगत, सुहास भगत, रमेश घरत, भरत भगत, संतोष भगत, सुदर्शन घरत, ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश भगत, निलेश भगत, महेश भगत, जीवन भगत, रहीम पाशा यांच्यासह अनेक स्थानिक मान्यवर, ग्रामस्थ आणि कार्यकर्ते उपस्थित होते.**

## नवी मुंबईकरांना पाण्याच्या तक्रारींसाठी हेल्पलाइन जारी



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी ३० मे रोजी मोरबे धरण प्रकल्पाला भेट देऊन जलस्त्रोतातील पाणी स्वतः पिऊन पाहणी केली. त्यानंतर भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्र, आग्रोळी येथील जलकुंभ, पंपिंग स्टेशन व स्काडा प्रणालीची प्रसारमाध्यम प्रतिनिधींसमवेत पाहणी केली. मोरबे धरणापासून येणाऱ्या पाण्यावर सुयोग्य जलशुद्धीकरण प्रक्रिया केली जात असून, मूळ जलस्त्रोतापासून प्रत्यक्ष जलकुंभापर्यंत प्रत्येक टप्प्यावर नियमितपणे दररोज पाण्याच्या चाचण्या घेतल्या जात आहेत. नागरिकांना शुद्ध पाणी मिळावे ही महापालिकेची भूमिका आहे. दररोज नियमित तपासण्या सुरूच आहेत, मात्र अद्यापही तक्रारी येत असल्याने पाण्याविषयीच्या तक्रारींच्या तत्काळ निवारणासाठी महापौर पाटील यांनी १८००२२२३०९ हा विनामूल्य टोल फ्री क्रमांक जाहीर केला आहे.

नुकताच मुख्य जलवाहिनी व इतर जलवाहिन्यांवर दोन दिवसांचा शटडाऊन घेतल्यानंतर काहीसे गढूळ पाणी येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार महापालिकेने तत्परतेने विविध ठिकाणांहून ६५० हून अधिक पाणी नमुने घेऊन त्यांची शुद्धता तपासली. या तपासणीत पाणी स्वच्छ आणि पिण्यायोग्य असल्याचे आढळले. या क्रमांकावर पाण्याविषयक तक्रारी नोंदविण्याचे आवाहन त्यांनी नागरिकांना केले आहे. प्राप्त तक्रारींच्या पत्त्यावर जाऊन महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी पाणी नमुने घ्यावेत, त्याची गुणवत्ता प्रत्यक्ष तपासावी आणि नागरिकांना माहिती देऊन आश्वस्त करावे, असे निर्देश महापौरांनी दिले आहेत.

याशिवाय महापौर सुजाता पाटील १ जून रोजी अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे आणि संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांसह स्वतः विविध ठिकाणांना भेट देऊन पाणी नमुन्यांची तपासणी पाहणार आहेत. नुकताच मोरबे धरणाच्या मुख्य जलवाहिनीवर दोन दिवसांचा शटडाऊन घेतल्याने पूर्ण रिकाम्या झालेल्या जलवाहिन्यांमध्ये खालील बाजूस बसलेला बारीक गाळ व पाईपला चिकटलेले मातीचे कण पाणीपुरवठा पूर्ववत सुरू झाल्यानंतर जलप्रवाहात ढवळले गेले. त्यामुळे सुरुवातीला काही काळ गढूळ पाणी आले. याशिवाय स्वतःच्या टाक्या असलेल्या इमारतींच्या टाक्याही शटडाऊनच्या काळात रिकाम्या झाल्या होत्या.

त्या साफ करून कालावधी उलटल्याने तळाशी बसलेला गाळ पाण्यात ढवळला गेला आणि काहीसे गढूळ पाणी नागरिकांच्या नळाद्वारे आले. मात्र शटडाऊननंतर कालावधी उलटल्याने स्वच्छ पाणीपुरवठा सुरू झाला आहे.अद्यापही काही नागरिकांकडे गढूळ पाणीपुरवठा होत असल्यास १८००२२२३०९ या टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदवावी. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी त्या ठिकाणी पोहोचून पाणी तपासणी करतील, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

# कान्सच्या रेड कार्पेटवरुन लाल मातीत कोकण हार्टेड अंकिता वालावलकरचे प्रेरणादायी सामाजिक कार्य

**माणगाव : बातमीदार**

फ्रान्समधील कान्स येथे दरवर्षी मे महिन्यात आयोजित करण्यात येणारा जगप्रसिद्ध आणि मानाचा कान्स चित्रपट महोत्सव नुकताच पार पडला. यावर्षी या महोत्सवात मराठी कलाकारांचीही विशेष उपस्थिती पाहायला मिळाली. ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, अभिनेत्री निवेदिता सराफ तसेच अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्यासह कोकणची लोकप्रिय 'कोकण हार्टेड गर्ल' अंकिता वालावलकर हिलाही रेड कार्पेटवर झळकण्याची संधी मिळाली.



कान्सहून भारतात परतताच अंकिताने पुन्हा एकदा आपली नाळ कोकणच्या लाल मातीत घट्ट रुजलेली असल्याचे दाखवून दिले. अंकिता आणि तिच्या सहकाऱ्यांनी त्यांच्या फाउंडेशनच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी भागांमध्ये जाऊन गरजू मुलांना कपडे आणि टोप्यांचे वाटप केले.

माणगावचे वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर यांच्या मार्गदर्शनाखाली येथील दुर्गराज किल्ले रायगड परिसरातील दऱ्याखोऱ्यांमधील तसेच माणगाव तालुक्यातील काही आदिवासी पाड्यांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. कपड्यांचे वाटप होताच मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेला निरागस आनंद अविस्मरणीय असल्याचे शंतनु यांनी सांगितले.

याबाबत बोलताना अंकिता वालावलकर म्हणाली, "अर्थानेक्सस ग्लोबल फाउंडेशनच्या माध्यमातून आम्ही सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबवत असतो. समाजातील गरजू लोकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवणे आणि लोकांनी विश्वासाने दिलेली मदत योग्य व्यक्तींपर्यंत पारदर्शकपणे पोहोचवणे हा आमचा मुख्य उद्देश आहे."

तिने पुढे सांगितले की, अलीकडेच एका ब्रँडकडून लहान मुलांसाठी कपडे आणि टोप्या देण्यात आल्या होत्या. त्या वस्तू गोदामात न ठेवता प्रत्यक्ष गरजू वस्त्यांमध्ये जाऊन मुलांना वाटण्याचा निर्णय घेण्यात आला. "त्या छोट्या मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद, त्यांचे हास्य आणि पालकांच्या डोळ्यांतील समाधान हे आमच्यासाठी सर्वात मोठे समाधान होते," असेही अंकिताने नमूद केले.

समाजात आजही अनेक कुटुंबांना मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागतो. अशा वेळी छोटीशी मदतदेखील एखाद्याच्या आयुष्यात मोठा बदल घडवू शकते, असे मत व्यक्त करत अंकिताने भविष्यातही अशाच सामाजिक उपक्रमांद्वारे गरजूंपर्यंत मदत पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त केला.

या उपक्रमावेळी अंकिता वालावलकरसोबत तिचे पती आणि प्रसिद्ध संगीतकार कुणाल भगत, पल्लवी निशांत भगत, सहकारी सौरभ पाटील तसेच वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर उपस्थित होते.

# तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात अडकवून आर्थिक फसवणूक करणारा जाळ्यात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सोशल मीडियावर फसवणुकीचे नवनवीन प्रकार सातत्याने समोर येत आहेत. त्यातच आता मेट्रोमोनी साईटवर तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या रसायनीतील एका भामट्याला मानपाडा पोलिसांनी अटक केली आहे.




आदर्श म्हात्रे ऊर्फ रुद्रेश गोंधळी (वय ३४) रा. तुराडे, रसायनी असे या आरोपीचे नाव असून, त्याने आतापर्यंत अनेक उच्चशिक्षित तरुणींना लाखो रुपयांचा गंडा घातल्याचे उघड झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आदर्श म्हात्रे हा फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर तरुणींची ओळख काढून, त्यानंतर मेट्रोमोनी साईटच्या माध्यमातून त्यांना आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढायचा. एकदा का तरुणी त्याच्या प्रभावाखाली आल्या की, त्यांना कर्ज काढायला लावून ते लाखो रुपये तो स्वतःच्या फायद्यासाठी वापरून पसार व्हायचा. या 'लखोबा लोखंडे'ने आतापर्यंत अनेक उच्चशिक्षित महिलांनाही आपली 'शिकार' बनवले असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे.

यापूर्वी अशाच प्रकारच्या फसवणुकीच्या गुन्ह्यांमध्ये नवी मुंबई पोलिसांनी त्याला अटक केली होती, तरीही त्याचे हे कारनामे सुरूच होते. पोलिसांनी दिलेल्या अंदाजानुसार, म्हात्रे याने शंभरहून अधिक महिला आणि तरुणींना फसवले असावे.

आदर्श म्हात्रे याच्या कारनाम्यांना कंटाळून आतापर्यंत ११ पीडित महिला आणि तरुणींनी धाडस दाखवत पोलिसांकडे तक्रारी नोंदवल्या आहेत.

नवी मुंबई पोलिसांनी त्याला अटक केल्याचे प्रसारमाध्यमांमध्ये समजताच डोंबिवलीतील एका पीडित तरुणीनेही पुढे येत, आपल्यासोबत झालेल्या फसवणुकीची तक्रार मानपाडा पोलीस ठाण्यात दाखल केली.

या तक्रारीची गंभीर दखल घेत मानपाडा पोलिसांनी तातडीने कारवाई करत म्हात्रे याच्या मुसक्या आवळल्या आहेत. या घटनेमुळे मेट्रोमोनी साईट वापरणाऱ्या तरुणींनी सावधगिरी बाळगावी, मेट्रोमोनी साईटचा वापर करुन राज्यात अनेक तरुण खोटी माहिती देउन फसवणुक करीत असल्याने सावधगिरी बाळगावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# पाताळगंगा एमआयडीसी ऑफिस रोडची दुर्दशा व घाणीचे साम्राज्य

**रसायनी : प्रतिनिधी**

पातळगंगा एमआयडीसी ऑफिसच्या बरोबर मागचा रस्ता जो सीईटी कडे जातो त्या रोडची प्रचंड दुर्दशा झालेली आहे व या रोडवर प्रचंड खड्डे पडले असून घाणीय साम्राज्य आहे . रस्त्यावर घाणीचे ढीग लावून ठेवलेले आहेत आणि ही सर्व घाण बाजूला असलेल्या नाल्यात पडत आहे. हे ढीग तातडीने उचलले पाहिजेत, अशी येथील ग्रामस्थांची मागणी आहे

रोडवर खड्डे असल्यामुळे रोडवर पाणी साठणार आहे. त्या भागात येथिल काही व्यापारी किंवा हॉटेलवाले तिथे कोंबड्यांचा कचरा ,पिसे टाकतात आणि याबाबत एमआयडीसी काही ऍक्शन घेत नाही काही कारवाई करत नाही यामुळे हा रोड म्हणजे अतिशय वाईट अवस्थेमध्ये आहे हा सर्व भाग एमआयडीसी च्या बरोबर मागचा भाग आहे जेथे टेलिफोन एक्सचेंज आणि वाहनतळ आहे याबाबत एमआयडीसी अधिकारी यांनी तातडीने कारवाई करून तेथे जे ढीग लावून ठेवले ते उचलून टाकले पाहिजेत

सिद्धेश्वरी कॉर्नर येथे गेल्या वर्षी पोलीस संरक्षणामध्ये तिथे अतिक्रमण काढली पण आता तेथे गाळे बांधून घेतलेले आहेत लोकांनी मग हे गाळे अधिकृत आहेत का किंवा अनाधिकृत आणि यावर एमआयडीसी काय भूमिका घेते याबाबत एमआयडीसी काहीच क्लिअर करत नाही फक्त अतिक्रमण आणि अनाधिकृत असेल तर तिथले ते गाळे उचलले गेले पाहिजेत तेथिल आतील रस्त्यांची पण अवस्था वाईट आहे नाला साफसफाई झालेली नाही याबाबत एमआयडीसीचे अधिकारी काय भूमिका करतात याकडे येथील ग्रामस्थांचे लक्ष आहे.



# मुरूड पालिकेतील नगररचना सहाय्यक अभियंता अनिकेत भोसले यांची बदली

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड जंजिरा नगरपरिषद कार्यालयातील रचना सहाय्यक पदावर असणारे अनिकेत भोसले यांची बदली ठाणे जिल्ह्यातील शहापुर नगरपंचायत या ठिकाणी बदली झाल्याने कर्मचारी, नागरिक तसेच विविध सामाजिक संघटनांमध्ये हळहळीची भावना व्यक्त होत आहे.



रचना सहाय्यक अभियंता अनिकेत भोसले यांनी कार्यालयीन कामकाजात प्रामाणिकपणे व तत्परतेने पारदर्शकता राखत नागरिकांच्या अडचणी सोडविण्यास प्राधान्य दिले.अनेक प्रलंबित प्रकरणांचा निपटारा केला होता विकासकामे, बांधकाम परवानग्या तसेच विविध प्रशासकीय प्रक्रियांमध्ये त्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला होता.त्यांच्या बदलीनिमित्त सहकारी कर्मचारी व स्थानिक नागरिकांनी त्यांना शुभेच्छा देताना त्यांच्या कार्याची प्रशंसा केली. "त्यांच्या कार्यपद्धतीमुळे कार्यालयाची प्रतिमा उंचावली असून, त्यांची उणीव निश्चितच जाणवेल," अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

यावेळी कार्यालायीन प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर यांनी नगरपरिषदेच्या वतीने रचना सहाय्यक अभियंता अनिकेत भोसले यांना पुष्पगुच्छ शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी नगर परिषदेचे कार्यालयीन प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर, सतेज निमकर, कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश आरेकर, सोनल पाटील, आशितोष पाटील, अभि चांदोरकर, शहरस्थरीय स्थापत्य अभियंता प्रधानमंत्री आवास योजनचे कर्मचारी रामकृष्ण भिसे, सतिश जंजिरकर,सुदेश माळी,प्रज्वल गुरव, दीपक शिंदे, पल्लवी पडवळ, नम्रता करडे, श्वेता विरकुड, स्मिता मुरुडकर, शुभ्रा कारभारी आदींसह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# मध्य रेल्वेतर्फे विविध जनजागृती उपक्रमांसह जागतिक तंबाखू विरोधी दिन

**रोहा : प्रतिनिधी**

जागतिक तंबाखू विरोधी दिन दरवर्षी ३१ मे रोजी साजरा केला जातो. याचा एक भाग म्हणून, मध्य रेल्वेने तंबाखू सेवनाच्या हानिकारक परिणामांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध स्थानकांवर जनजागृती उपक्रम राबवले आहेत.

प्रवाशांना तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन टाळण्याचे आवाहन करणारे संदेश स्थानक परिसरात लावलेल्या फलकांवर ठळकपणे प्रदर्शित करण्यात आले. प्रवाशांना तंबाखू सेवनाची सवय सोडण्यासाठी समुपदेशन करण्यात आले. त्यापैकी अनेकांनी प्रतिकात्मक कृती म्हणून या उद्देशासाठी ठेवलेल्या कचराकुंड्यांमध्ये आपली तंबाखूची पाकिटे टाकली.

स्थानक व्यवस्थापक आणि त्यांच्या समर्पित कर्मचाऱ्यांच्या टीमच्या मार्गदर्शनाखाली ३० आणि ३१ मे २०२६ रोजी रे रोड स्थानकावर एक स्वाक्षरी मोहीम आयोजित करण्यात आली होती, जिथे प्रवाशांना तंबाखू न वापरण्याची शपथ घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. या उपक्रमाला प्रवाशांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला, ज्यांनी सक्रियपणे सहभाग घेतला आणि या कार्याला पाठिंबा दिला.

मध्य रेल्वे प्रवाशांचे आरोग्य आणि कल्याण जपण्यासाठी कटिबद्ध आहे आणि सर्व रेल्वे प्रवाशांना रेल्वे स्थानकांवर व रेल्वेगाड्यांमध्ये तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन टाळण्याचे आवाहन केले आहे.

# रसायनी पिल्लई कॉलेजच्या गुणगौरव समारंभात स्वरा पन्हाळेचा सत्कार

**खोपोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी/ मार्च २०२६ मध्ये घेतलेल्या इ. १० वीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या परीक्षेत प्रिया स्कूलची (इंग्रजी माध्यम ) विद्यार्थीनी स्वरा संतोष पन्हाळे हिने ९५% गुण संपादन करून रसायनी/ मोहपाडा परिसरात दुसरा क्रमांक पटकावला आहे. तालुक्यातील सर्व इंग्रजी माध्यम शाळांतून मराठी विषयात ९७% विशेष गुण मिळवून ती प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे.

यंदा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निकाल जाहीर केल्यावर इंग्रजी माध्यमच नाही, तर मराठी माध्यमातीलही १०वी/ १२ वी च्या विद्यार्थ्यांची मराठी विषयाची प्रगती चिंताजन असतांना स्वरा पन्हाळे हिने मात्र इंग्रजी माध्यमात शिकूनही मराठी विषयात सर्वोत्तम म्हणजे चक्क ९७% गुण मिळवून ,प्रथम येण्याचा मान मिळवल्याने शिक्षण क्षेत्रात तिचे विशेष कौतुक होत आहे. पिलाई एचओसीएल् एज्युकेशनल कँपस, रसायनी या संस्थेच्या पिलाई कॉलेज रसायनी या कॉलेज मार्फत दिनांक ३० –०५ –२०२६ रोजी स्वरा पन्हाळेला प्रशस्तीपत्र व सुवर्ण पदक देऊन तिचा संस्थेने सत्कार केला.

# गरिबांचे शेठ मंत्री भरतशेठ

महाड विधानसभा मतदार संघातून सलग चौथ्यांदा आमदार म्हणून निवडून येऊन ज्यांनी विक्रम प्रस्तापित केला ते महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी योजना,फलोत्पादन व खारभूमी विकासमंत्री आमचे नेते तथा मार्गदर्शक आदरणीय ना. भरतशेठ गोगावले यांचा आज दि.१ जून रोजी वाढदिवस असून त्यांना सुरुवातीलाच माणगाव शहराच्यावतीने वाढदिवसाच्या मनःपूर्वक लाख –लाख हार्दिक शुभेच्छा! ना.भरतशेठ यांचे राजकीय व सामाजिक जीवनात मोठे योगदान आहे. जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा मानून ते आज बहुजन समाजात सामाजिक बांधिलकी व जातीय सलोखा राखून काम करीत आहेत. रायगड जिल्हा परिषद सदस्य,राजिपचे बांधकाम समिती सभापती म्हणूनही त्यांनी यापूर्वी काम केले आहे. राजिप सदस्य व सभापती म्हणून त्यांनी आपल्या कार्याची मतदार संघात छाप पडल्यावर त्यांना महाड विधानसभा मतदार संघाचे शिवसेनेतफे तिकीट देण्यात आले.



यावेळी पाहिल्याचवेळी ना.भरतशेठ गोगावले साहेब हे जनतेच्या आशीर्वादाने भरघोस मतांनी निवडून आले. त्यानंतर सलग चारवेळा ते महाड विधानसभा मतदार संघातून आमदार म्हणून निवडून येऊन त्यांनी आमदारकीचा चौकार लगावला आहे. ते महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री शिवसेना नेते एकनाथ शिंदेसाहेबांचे अत्यंत विश्वासू व निकटचे सहकारी म्हणून ओळखले जातात. महायुतीच्या सरकारमध्ये सहभागी होताना एकनाथ शिंदे साहेबांना भरतशेठनी मोलाचे असे सहकार्य केले. महायुतीच्या सरकारमध्ये एकनाथ शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी ना.भरतशेठनी वेळोवेळी त्यांना साथ दिली आहे. आमचे नेते एकनाथ शिंदे साहेब जो निर्णय घेतील तो मला मान्य असल्याचे नेहमीच भरतशेठ आदरपूर्वक सांगत असतात. त्यामुळे एकनाथ शिंदे साहेबांकडे भरतशेठ यांचे ऋणानुबंधाचे असे संबंध आहेत. ना.भरतशेठ यांनी महाड विधानसभा मतदार संघात अनेक कोट्यवधी रुपयांची विविध विकासकामे करून आपल्या कार्याचा प्रभाव मतदार संघात पाडला आहे. दूरदृष्टी ठेऊन विविध विकासाची कामे त्यांनी महाड मतदार संघातील महाड,पोलादपूर,माणगाव तालुक्यात केली आहेत. त्यामुळे जनमाणसांत विकास पुरुष म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. विकासकामे करण्याबरोबरच गोरगरीब जनतेला तसेच अडीअडचणीत असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला ते वेळोवेळी मदतीचा हात देत असतात. त्यांच्या महाड तालुक्यातील ढालकाठी येथील बंगल्यावर दररोज जनता दरबार भरलेला असतो. याठिकाणी आलेल्या लोकांचे चहापाणी नाश्ता देऊन यथोचित स्वागत केले जाते.

यानंतर या लोकांचे प्रश्न,समस्या भरतशेठ ऐकून घेऊन त्यांचे प्रश्न व समस्या सोडवतातच शिवाय त्यांना काही वैयक्तिक आर्थिक मदतीचा हात देत असतात. असा गोरगरिबांच्या कल्याणासाठी देवरूपाने उभा असलेला लोकप्रतिनिधी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात मोजकेच असतील असे अनेकजण सांगत असतात. गरीब जनतेच्या आशीर्वादाने त्यांची महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी योजना,फलोत्पादन व खारभूमी विकासमंत्री म्हणून वर्णी लागली आहे. ते रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री व्हावेत हि संपूर्ण रायगड वासियांची इच्छा आहे. त्यांना पुन्हा एकदा वाढदिवसाच्या मनःपूर्वक लाख – लाख हार्दिक शुभेच्छा!

**–प्रसाद धारिया,**
**माणगाव शहरप्रमुख**

# नागाव हाटाळे आठवडा बाजार : आधुनिकतेतही जपला जातोय ग्रामसंस्कृतीचा जिवंत वारसा

**नागाव : प्रतिनिधी**

ऑनलाइन खरेदी, सुपरमार्केट आणि मोठमोठ्या मॉलच्या वाढत्या प्रभावाच्या काळातही नागाव येथील हाटाळे आठवडा बाजार आजही ग्रामीण जीवनाचा अविभाज्य भाग म्हणून टिकून आहे. प्रत्येक गुरुवारी भरणारा हा पारंपरिक बाजार नागरिकांच्या मोठ्या प्रतिसादामुळे आजही तितकाच गजबजलेला दिसून येतो.



नागावसह परिसरातील अनेक गावांतील नागरिक घरगुती आवश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी या बाजाराला प्राधान्य देतात. बाजारात भाजीपाला, फळे, धान्य, किराणा साहित्य, सुकी व ओली मासळी, मसाले, भांडी, कटलरी सामान, तयार कपडे, इलेक्ट्रिक वस्तू, मिठाई, खेळणी तसेच विविध दैनंदिन वापराच्या वस्तू माफक दरात उपलब्ध होत असल्याने ग्राहकांची मोठी गर्दी होत असते.

विशेषतः सुक्या मासळीच्या खरेदीसाठी बाजारात मोठी झुंबड उडताना दिसते. कोळीणी महिला स्वतःच्या वाहनांमधून सुकी मासळी विक्रीसाठी येथे येतात, हे या बाजाराचे खास वैशिष्ट्य मानले जाते. त्यामुळे या बाजारात दर आठवड्याला हजारो रुपयांची उलाढाल होत असल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगितले जाते.

पूर्वी दळणवळणाची साधने मर्यादित असतानाही नागरिक आवश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी या आठवडा बाजारावर अवलंबून होते. आज आधुनिक सुविधा उपलब्ध असल्या तरी कमी दर, ताजा माल आणि स्थानिक विक्रेत्यांशी असलेला विश्वास यामुळे बाजाराची लोकप्रियता कायम आहे.

स्थानिक शेतकरी, छोटे व्यावसायिक आणि विक्रेत्यांसाठी हा बाजार महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन ठरत असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचे काम करत आहे. सकाळपासूनच ग्राहकांची वर्दळ सुरू होत असून संपूर्ण परिसर उत्साहाने गजबजून जातो.

औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि मॉल संस्कृतीच्या वाढत्या प्रभावामुळे ग्रामीण परंपरा हळूहळू कमी होत असताना नागावचा हाटाळे आठवडा बाजार मात्र ग्रामसंस्कृती, सामाजिक एकोपा आणि पारंपरिक बाजारपेठेची ओळख जपणारा जिवंत वारसा म्हणून आजही नागरिकांच्या पसंतीस उतरला आहे.

# मोहोपाडा येथे ५ जून रोजी पेन्शनर्सची सभा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी आणि पाताळगंगा परिसरातील सर्व पेन्शनधारकांसाठी एक महत्त्वाची सभा शुक्रवार, दिनांक ५ जून रोजी आयोजित

करण्यात आली आहे. मोहोपाडा येथील आंबेडकर भवन येथे सकाळी ठीक १० वाजता ही सभा सुरू होईल. या सभेमध्ये पेन्शनधारकांना मार्गदर्शन करण्यासाठी अनिल तेंडुलकर आणि इतर मान्यवर सहकारी उपस्थित राहणार आहेत. पेन्शनधारकांच्या विविध समस्या आणि त्यांना मिळणाऱ्या सुविधांबाबत या सभेत चर्चा होण्याची शक्यता आहे.

पेन्शनधारकांनी जास्तीत जास्त संख्येने या सभेला परिसरातील सर्व उपस्थित राहावे, अशी विनंती उपाध्यक्ष आर. के. कांबळे आणि सचिव रवींद्रनाथ सोमण यांनी केली आहे.

# उकाड्याने नागरिक हैराण; उसाचा रस, नारळपाणी, ज्यूसला पसंती

**खोपोली : प्रतिनिधी**

वाढत्या उष्णतेने रौद्ररूप धारण केल्याने नागरिक हैराण झाले आहे.यामूळे शरिराला गारवा मिळण्यासाठी प्रत्येकजण, चैत्राच्या अगमनाने वृक्षांना आलेल्या हिरवी गार पानाच्या छायेखाली या सावळीचा आधार घेतला जात आहे.तर रणरणत्या उन्हामध्ये विविध ठिकाणी उभारलेले स्टॉल विक्रीस ठेवण्यात आलेले,थंड पेय,आणी फळे यांच्याकडे प्रत्येकजण आकर्षित होत आहे.



मे महिन्याच्या अखेरीस तापमानात झालेल्या वाढीमुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. सकाळपासूनच उन्हाचा कडाका जाणवत असून दुपारच्या वेळी रस्त्यांवर वर्दळ कमी होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. उष्णतेपासून दिलासा मिळवण्यासाठी नागरिकांचा कल थंड शीतपेये, उसाचा रस, लिंबूपाणी, ताक, नारळपाणी आणि विविध फळांच्या ज्यूसकडे वाढला आहे.

दरम्यान, वाढत्या तापमानामुळे थंड पेयांच्या विक्रीत लक्षणीय वाढ झाली असून स्थानिक व्यावसायिकांना त्याचा फायदा होत आहे. आगामी काही दिवस तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात असल्याने नागरिकांनी उष्माघातापासून बचावासाठी योग्य ती खबरदारी घेण्याची गरज व्यक्त होत आहे.

# उलवे नोडमध्ये लॉन टेनिस स्पर्धा रंगली

■ लोकनेते रामशेठ ठाकूर यांची लाभली उपस्थिती




**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

वय वाढले तरी जिद्द, उत्साह आणि खेळण्याची ऊर्मी कशी कायम राखायची याचे एक अप्रतिम उदाहरण रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये पहायला मिळाले. रोटरी क्लब ऑफ नवी मुंबई सनराईज आणि एस टेनिस क्लब खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने वरिष्ठ नागरिक आणि क्लब ५५च्या सदस्यांसाठी वार्षिक लॉन टेनिस स्पर्धेचे दिमाखदार आयोजन करण्यात आले होते. हा क्रीडा सोहळा रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये शनिवारी (दि.३०) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत रंगला.

'रोटरी'चे माजी अध्यक्ष कमलनयन शिरोळकर यांनी या स्पर्धेचे संयोजक म्हणून जबाबदारी सांभाळली. या यशस्वी आयोजनासाठी रोटरी क्लब ऑफ सॅटेलाईट सिटी नवी मुंबई आणि इनरव्हील क्लब ऑफ नवी मुंबई सनराईज यांनी प्रायोजकत्व दिले होते. दरवर्षीप्रमाणे यंदाही या स्पर्धेत देशभरातून आलेल्या क्लब ५५च्या सुमारे ३८ खेळाडूंनी सहभाग नोंदवला. यामध्ये ५५ ते ६५ वर्षे वयोगटासाठी ज्युनिअर ग्रुप, ६६ ते ७५ वर्षे वयोगटासाठी सिनिअर ग्रुप आणि ७६ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या खेळाडूंसाठी सुपर सिनिअर ग्रुप तयार करण्यात आला होता. स्पर्धेचे मुख्य आकर्षण म्हणजे ८६ वर्षांच्या आजोबांनीदेखील मैदानात उतरून तरुणांना लाजवेल अशा चपळतेने टेनिसचे शॉट्स खेळले.

प्रत्येक गटात चुरशीचे आणि अटीतटीचे सामने झाले, ज्याने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. या स्पर्धेला लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विशेष उपस्थिती लावून खेळाडूंना प्रोत्साहन दिले आणि त्यांच्या हस्ते विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. या खेळात सहभागी झालेल्या प्रत्येक खेळाडूच्या वेळेची, ऊर्जेची आणि क्रीडा कौशल्याची कदर करत आयोजकांतर्फे सर्वांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.




# सात्विक-चिराग जोडीने सिंगापूर ओपन स्पर्धा जिंकली



**सिंगापूर : वृत्तसंस्था**

सात्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारताच्या माजी नंबर वन जोडीने अखेर आपला जेतेपदाचा दुष्काळ संपवला आहे. या स्टार जोडीने पहिल्यांदाच सिंगापूर ओपनच्या जेतेपदावर आपले नाव कोरले. सात्विक–चिरागने पुरुष दुहेरीच्या अंतिम सामन्यात इंडोनेशियाच्या फजर अल्फियान आणि मोहम्मद सोहिबुल फिक्री या जोडीचा पराभव केला.

एक तास १३ मिनिटे चाललेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात सात्विक–चिरागने इंडोनेशियन जोडीचा १८–२१, २१–१७, २१–१६ असा पराभव करत आपले तिसरे 'सुपर ७५०' जेतेपद पटकावले. जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर असलेल्या भारतीय जोडीसाठी हे जेतेपद अत्यंत खास आहे, कारण सिंगापूर ओपनमध्ये दुहेरीचे जेतेपद जिंकणारी ही पहिलीच भारतीय जोडी ठरली आहे. आशियाई खेळ आणि राष्ट्रकुल खेळांमधील सुवर्णपदक विजेत्या या भारतीय जोडीने दोन वर्षांतील आपले पहिले आणि जागतिक टूरमधील एकूण नववे जेतेपद पटकाविले आहे.

यापूर्वी सात्विक–चिरागच्या जोडीने २०२४मध्ये थायलंड ओपनचे जेतेपद जिंकले होते. त्यानंतर ही भारतीय जोडी चार वेळा अंतिम फेरीत पोहचली, पण त्यांना जेतेपदाने हुलकावणी दिली होती. अखेर सिंगापूर ओपनमध्ये या जोडीने उत्कृष्ट कामगिरी करत जेतेपदाचा दुष्काळ संपवला.

## नेपाळच्या कुशल भुर्तेलचे वादळी शतक

**सिंगापूर** : आशियाई स्पर्धेत टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांची पात्रता फेरी सुरू झाली आहे. या अंतर्गत सिंगापूरच्या नॅशनल क्रिकेट मैदानावर रविवारी (दि.३०) झालेल्या सामन्यात नेपाळच्या कुशल भुर्तेल याने चीनविरुद्ध वादळी फलंदाजी करीत विक्रमी शतक ठोकले. त्याने पाच चौकार आणि तब्बल १६ षटकारांसह ४३ चेंडूमध्ये १२९ धावांनी शानदार खेळी केली. यात चीनचा गोलंदाज चेन झुओ युए याच्या षटकात सलग सहा षटकार (६,६,६,६,६,वाईड,६) मारण्याचा पराक्रम केला.







